मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-४५ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## मंत्र्यांनतर आता सरकारी 'बाबू'चा 'तीन पत्ती'चा खेळ, चंद्रपूरात चर्चा

**चंद्रपूर :** शासकीय कार्यालयात नागरिकांच्या कामासाठी नियुक्त केलेले कर्मचारी कार्यालयीन वेळेत संगणकावर 'पत्ते' खेळताना आढळल्याचा धक्कादायक प्रकार भद्रावती पंचायत समितीमध्ये समोर आला आहे. पंचायत समिती कार्यालयातील एका कर्मचाऱ्याचा संगणकावर बसून पत्ते खेळतानाचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. नुकतेच विधानसभेत रमी खेळतानाचा व्हिडीओचे प्रकरण ताजे आहे. यामुळे माणिकराव कोकाटे यांचे कृषीमंत्रीपद बदलले गेले आहे. अशात आता सरकारी बाबूही संगणकावर पत्ते खेळत असल्याने एकच चर्चा सुरु आहे.



**खरे भारतीय अशी विधाने करणार नाहीत!**
सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना फटकारले...

पान ८

**महापालिका निवडणुकांचे बिगुल लवकरच वाजणार**

# नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी देण्यात आली आहे. नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे निवडणुकांच्या मार्गातील अडथळे दूर झाले असून आता लवकरच महापालिका निवडणुकांचे बिगुल लवकरच वाजण्याची शक्यता आहे.




नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी मिळाली आहे. नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. त्या याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे आता नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी मिळाली आहे. या निकालामुळे निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालनंतर आता लवकरच निवडणुकांचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणुका आता लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. न्यायालयाने प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्याने आता नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुका जाहीर होऊ शकतात. नवीन वार्ड रचनेनुसारच या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे.

राज्यातील नाशिक महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका, पुणे महापालिका, मुंबई महापालिका यांच्या प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते. मात्र नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका कोर्टात सादर करण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायलयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात दिलेल्या निकालात स्पष्ट केलं होतं की , निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसारच होतील, आणि प्रभाग रचना ठरवण्याचा अधिकार हा राज्य सरकारचा असेल. मात्र, त्यानंतरही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. ती याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे आता या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसारच होणार आहे. त्यामुळे आता राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिकांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे.

# सगळे पायाभूत प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण व्हायला हवेत !

प्रतिनिधी
■ मुंबई



पायाभूत प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता, ते हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत ते पूर्णत्वास यायलाच हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी वॉर रूमच्या बैठकीत दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "आपल्याकडे तंत्रज्ञान अद्ययावत आहे. त्यामुळे कमी कालावधीत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत. मुंबईसह राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी ज्या अडचणी येतात, त्यांचे निराकरण वेळेत करावेत. तसेच मेट्रो प्रकल्पाच्या शेवटच्या स्थानकाजवळ गृहनिर्माण प्रकल्प उभारावेत. तसेच मेट्रो प्रकल्प वेळेत मार्गीत लागण्यासाठी कुशल यंत्रणा तयार करणं आवश्यक आहे." मेट्रो प्रकल्प तसेच इतर सुविधा प्रकल्पांसाठी लागणारा निधी तातडीनं वितरीत करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

"पायाभूत सुविधा प्रकल्प राबविताना तो वेळेत पूर्ण होईल, याकडं सर्वांनी लक्ष द्यायला हवे. प्रत्येकाचं स्वतंत्र डॅशबोर्ड न करता फक्त सीएम डॅशबोर्डवरच प्रत्येक प्रकल्पाची सद्यःस्थिती नोंदविली गेलीच पाहिजे. प्रकल्पासंबंधित सर्व गोष्टी या डॅशबोर्डवर वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावेत. तसेच प्रकल्पातील अडचणी सोडविण्यासाठी वॉररुम आढावा बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्यात यावे. आवश्यक अशा बाबींसाठी मंत्रिमंडळ बैठकीत विषय आणून ते विषय पूर्णत्वास आणायला हवेत. तसेच आढावा बैठकीतील निर्णयानंतरही काही अडचण आल्यास वॉररुमला कळविण्यात यावे, जेणेकरून त्या अडचणी तातडीने सोडविता येतील. वॉररुमधील प्रकल्पांची तसेच निर्णयांची अंमलबजावणी गांभीर्यानं करावी," असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

यावेळी बीडीडी चाळ, मुंबईतील मेट्रो लाईन 4 (वडाळा ते कासारवडवली), मेट्रो लाईन 5 (ठाणे-भिवंडी-कल्याण), मुंबई मेट्रो 6 (स्वामी समर्थनगर-विक्रोळी), मेट्रो लाईन 2 बी (डीएन नगर ते मंडाळे), मुंबई मेट्रो 7 ए (अंधेरी-छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल 2), मुंबई मेट्रो लाईन 9 (दहिसर (पू) ते मिरा भाईंदर), ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह टनेल प्रकल्प, बोरिवली ते ठाणे जोड बोगदा प्रकल्प, **पान8वर**

# भारतावर अजून भरपूर टॅरिफ लावणार

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची उघड धमकी**

■ वॉशिंग्टन



"रशियाच्या शस्त्रांमुळे युक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत, याच्याशी भारताला काही घेणं-देणं नाही", असे सांगत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून अमेरिकेमध्ये पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंवरील टॅरिफमध्ये भरपूर वाढ करणार असल्याचा इशारा दिला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी रात्री एक ट्विट केले आहे. ट्रूथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी भारत रशियाकडून विकत घेत असलेल्या तेलाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. भारत प्रचंड नफाही यातून मिळवत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "भारत रशियाकडून फक्त तेल खरेदी करत आहे, इतकंच नाही; तर त्या तेलातील मोठा हिस्सा खुल्या बाजारात विकून भरपूर नफाही कमवत आहे."

"भारताला या गोष्टीशी काही देणं-घेणं नाही की, युक्रेनमध्ये रशियाच्या वॉर मशीनमुळे किती लोक मारले जात आहेत. याच कारणामुळे मी भारतावरील टॅरिफ भरपूर वाढवणार आहे", असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

यापूर्वी ३० जुलै रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लागू करण्याची घोषणा केली आणि त्यासंदर्भातील कार्यकारी निर्णयावर स्वाक्षरीही केली आहे. त्यानंतर आता नव्याने टॅरिफ वाढवण्याबद्दल त्यांनी विधान केले आहे. डोनाल्ड ट्रम्प हे मागील काही महिन्यांपासून भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवावे, असे म्हणत आहेत. रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवल्यास भारतावर दंडही आकारणार असेही त्यांनी जाहीर केले आहे.

# उद्धव ठाकरेंचा दिल्ली दौरा राहुल गांधींकडून निमंत्रण, इंडिया आघाडीची महत्त्वाची बैठक

प्रतिनिधी
■ मुंबई



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असल्याने, लवकरच निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्यात सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणुकांची रणनीती आखायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुक निकालापासून एकही बैठक न झालेल्या इंडिया आघाडीची आता दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीसाठी शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे दिल्लीला जाणार आहेत.

एकीकडे मनसे-शिवसेना युतीची चर्चा सुरू असताना दुसरीकडे ठाकरेंची दिल्लीदौराही चर्चेत आहे. उद्धव ठाकरे 6 ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहचणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे राहुल गांधींनी त्यांना स्वत: फोन करून आमंत्रणा दिले आहे.तसेच राहुल गांधी यांच्या निवासस्थानी भोजनाचे आमंत्रण देखील ठाकरेंना असल्याची माहिती आहे. 7 तारखेला होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीला इंडिया आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच पावसाळी अधिवेशनानिमित्ताने दिल्लीत असलेल्या शिवसेना पक्षाच्या खासदारांची सुद्धा उद्धव ठाकरे यांच्यासोबत दिल्ली दौऱ्यात बैठक होणार आहे.

महाराष्ट्रातून शिवसेना उबाठाकडून उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शरद पवार, सुप्रिया सुळे उपस्थित राहणार आहेत. इंडिया आघाडीच्या इतर राज्यातील सर्व प्रमुख नेत्यांना सुद्धा या बैठकीचे निमंत्रण दिले असल्याची माहिती मिळत आहे.

# श्रावणी कावड यात्रेसाठी गेलेल्या नालासोपाऱ्यातील दोघांचा बुडून मृत्यू

प्रतिनिधी
■ वसई



श्रावण सोमवारनिमित्त निघालेल्या कावड यात्रेतील दोन युवक आज तुंगारेश्वर नदीत बुडाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सचिन यादव (18 वर्षे ) आणि हिमांशू विश्वकर्मा (वय 18 वर्षे) अशी मयत तरुणांची नावे आहेत.

हे दोघे तरुण कॉलेजमध्ये शिक्षण घेणारे युवक आहेत. येथील नालासोपारा पूर्वेकडील श्रीराम नगर येथील राहणारे हे रहिवाशी आहेत.

नालासोपारातून आज कावड यात्रेसाठी एक ग्रुप विरारच्या मांडवी येथे निघाला होता. त्यातील सहा जण वसईच्या तुंगारेश्वर येथे पोहचले आणि त्यातील एक जण येथील नदीत पाय घसरून पडला, त्याचा धक्का दुसऱ्याला बसल्याने दोघेही नदीत पडले. नदीत पडलेल्या दोघांना वाचवण्यासाठी तिसरा मुलगा प्रयत्न करत असताना तोही बुडाला. मात्र, सुदैवाने त्याला इतर मुलांनी वाचवले. मात्र, या दुर्घटनेत नदीत पडेलल्या दोन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

तरुणांनी किंवा कुणीही तुंगारेश्वर मंदिरात गेल्यानंतर पाण्याकडे जाऊ नये, अंघोळीसाठी पाण्यात उतरू नका, असे आवाहन स्थानिक ग्रामस्थ आणि पोलीस प्रशासनाने केले आहे.

# AI चा वापर करून कार्यक्षमता वाढवा!

प्रतिनिधी
■ वॉशिंग्टन



**सुंदर पिचाई यांचे गूगलच्या कर्मचाऱ्यांना आवाहन**

हिंदुस्थानी वंशाचे आणि गुगल कंपनीचे सीईओ सुंदर पिचाई यांनी कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवण्याचे आवाहन केले आहे. गूगलच्या मूळ कंपनी अल्फाबेटच्या एका अलीकडील बैठकीत (ऑल-हँड्स मीटिंग) त्यांनी हे आवाहन केलं आहे. यावेळी पिचाई यांनी म्हणाले आहेत की, कंपनीला सध्याच्या AI क्रांतीच्या काळात अधिक कार्यक्षमतेने काम करणे आवश्यक आहे.

यावेळी सुंदर पिचाई म्हणाले की, जेव्हा तुम्ही मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीच्या काळातून जाता, तेव्हा सामान्यतः मनुष्यबळ वाढवले जाते. परंतु, या AI युगात आपल्याला या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन अधिक उत्पादकता साध्य करायची आहे. ते म्हणाले, कंपनीला आपल्या संसाधनांचा काटकसरीने वापर करून अधिक कार्यक्षम आणि प्रभावी बनण्याची गरज आहे.

दरम्यान, गूगलने 2025 मध्ये AI क्षेत्रात 85 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे, जी गेल्या वर्षीच्या 75 अब्ज डॉलर्सच्या तुलनेत मोठी वाढ आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने AI मॉडेल्स आणि साधनांना समर्थन देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्रित आहे. पिचाई यांनी स्पर्धेच्या बाबतीतही भाष्य केले. ते म्हणाले, आम्ही जगातील इतर कंपन्यांशी स्पर्धा करत आहोत. काही कंपन्या या AI युगात कर्मचारी उत्पादकतेच्या बाबतीत अधिक कार्यक्षम होत आहेत. त्यामुळे आपल्यालाही यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

**सिराज बनला विजयाचा 'महाराज'**

# ओव्हल कसोटीत गोऱ्या साहेबांच्या जबड्यातून विजय आणला खेचून

वृत्तसंस्था
■ लंडन

ओव्हल कसोटीच्या शेवटच्या दिवशी ४ विकेट घेत भारताने ६ धावांनी विजय मिळवला. यासह, संघाने ५ सामन्यांच्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीमध्ये २-२ अशी बरोबरी साधली. मोहम्मद सिराजने दुसऱ्या डावात ५ विकेट घेत सामना उलटला आणि संघाला रोमांचक विजय मिळवून दिला.चौथ्या दिवशी शतकवीर ब्रुक्सचा झेल घेताना सीमारेषेला पाय लागल्याने सारेच सिराजला दोष देत होते. पण जिगरबाज सिराजने आपल्या या चुकीचे परिमार्जन इंग्लंडच्या ५ फलंदाजांना बाद करीत केले. सिराजने इंग्लंडच्या तळाच्या फलंदाजांना विजयासाठीच्या ३५ धावाही मिळू दिल्या नाहीत. त्याच्या पराक्रमाने त्याने गोऱ्या साहेबांच्या जबड्यातून विजय अक्षरश: खेचून आणला. टीम इंडियाने ही पाचवी ओव्हल कसोटी केवळ ६ धावांनी जिंकत संघाला मालिकेत २-२ अशी ऐतिहासिक बरोबरी साधून दिली. संघाच्या विजयाचा 'महाराज' १०४ धावांत ५ विकेट घेणारा सिराज ठरला.

शेवटच्या दिवशी इंग्लंडला ३५ धावांची आवश्यकता होती, तर त्यांच्याकडे ४ विकेट शिल्लक होत्या. मोहम्मद सिराजने भारतासाठी शानदार गोलंदाजी केली आणि टीम इंडियाला विजय मिळवून देण्यात तो सर्वात मोठा हिरो ठरला.

**सविस्तर वृत्त पान 7 वर**

# १५४ जणांना घेऊन जाणारी बोट समुद्रात उलटली; ६८ जणांचा मृत्यू

**७४ जण बेपत्ता**

■ सन्ना

येमेनच्या अबयान किनाऱ्याजवळ रविवारी मोठी बोट दुर्घटना घडली. ३ ऑगस्ट रोजी प्रवाशांनी भरलेली बोट समुद्रात बुडाली. बोटीत १५४ प्रवासी होते. त्यापैकी किमान ६८ प्रवाशांचा मृत्यू झाला. तर, इतर ७४ प्रवासी बेपत्ता असल्याची माहिती आहे. बोटीतील सर्व प्रवासी इथिओपियातील रहिवासी होती. जे येमेनमार्गे सौदी अरेबियामध्ये रोजगाराच्या शोधात निघाले होते.

ही दुर्घटना पहाटेच्या सुमारास घडली. एडनच्या आखातात ही बोट उलटली. या घटनेनंतर खानफार जिल्ह्यात ५४ मृतदेह किनाऱ्यावर वाहून आल्याची माहिती आहे. तर, १४ मृतदेह झिंजीबार शहरातील रूग्णालयात नेण्यात आले आहे. या अपघातातून १२ जण बचावले असून, त्यामधील ९ इथिओपियन आणि येमेनी नागरिक आहे.

अपघात घडल्यानंतर मोठी शोधमोहिम राबवण्यात आली. किनारपट्टीवर विविध भागांमध्ये मृतदेह विखुरलेले आढळले. दरम्यान, बचाव पथकाला शोधमोहिमेत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# अलमट्टी धरण उंची वाढवण्यासंदर्भातील कर्नाटकचा प्रस्ताव केंद्राने परत पाठवला

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली



अलमट्टी धरणाच्या उंचीचे प्रकरणी न्यायप्रविष्ट असल्याने केंद्र सरकारने कर्नाटक सरकारचा प्रस्ताव परत पाठवला असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी दिली. कोणत्याही परिस्थिती धरणाची उंची वाढवू नये, अशी मागणी राज्यातील शिष्टमंडळाने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे केली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. यावेळी केंद्रीय मंत्र्यांनी या प्रकरणाची राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरणाकडून चौकशी करण्याचे आश्वासन दिल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत सांगितले. महाराष्ट्राच्या आक्षेपांची चौकशी या प्राधिकरणाकडून केली जाणार आहे.

जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांना भेटलेल्या शिष्टमंडळामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह छत्रपती शाहू महाराज, धनंजय महाडिक, धैर्यशील पाटील, **पान 8 वर**

**म ह त्त्वा चे**

## 'झामुमो'चे सर्वेसर्वा शिबू सोरेन यांचे निधन



**नवी दिल्ली -** राज्यसभा खासदार आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन (गुरुजी) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांनी दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून ते तिथेच दाखल होते. न्यूरोलॉजी, कार्डिओलॉजी आणि नेफ्रोलॉजीमधील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम त्यांच्यावर उपचार करत होती.त्यांची प्रकृती गंभीर होती. त्यांना ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यामुळे त्यांच्या शरीराच्या डाव्या बाजूला अर्धांगवायू झाला होता. ८१ वर्षीय गुरुजी बऱ्याच काळापासून किडनीच्या आजाराने ग्रस्त होते. गेल्या एक वर्षापासून ते डायलिसिसवर होते. त्यांना मधुमेह होता, तसेच त्यांच्या हृदयाची बायपास शस्त्रक्रियादेखील झाली होती.

## गुन्हा नोंदवून घेण्यास टाळाटाळ का?



**मुंबई -** राज्यातील पोलीस यंत्रणा सर्वसामान्य जनतेवर कायद्याची दंडेलशाही दाखवत आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. तसेच पुण्यातील कोथरूड पोलीसांनी तीन तरुणींच्या घरात घुसून त्यांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेतले, त्यांना जातिवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. ज्या पोलिसांनी हा प्रताप केला आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ का केली जात आहे? या पोलिसांवर अॅट्रॉसिटी कलमाखाली तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करा, अशी मागणीही सपकाळ यांनी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, एका महिलेला मदत केल्याच्या **पान 8 वर**

## खान सरांकडून श्रावणी सोमवारी डायलिसिस सेंटरची स्थापना



**पाटणा -** बिहारच्या प्रसिद्ध खान सरांनी आज श्रावण सोमवारचे औचित्य साधत डायलिसिस सेंटरची स्थापना केली आहे. ते म्हणाले, आज श्रावणी सोमवार आहे. आपण नेहमीच समाजाच्या प्रति काहीतरी चांगले केले पाहिजे. आज महादेवाचा वार आहे. त्यामुळे आज रुग्णांसाठी डायलिसिस सेंटर सुरू केले आहे. या सगळ्या मशीनरी आम्ही जर्मनीमधून आणल्या आहेत. पेशंटला आठवड्यातून तीन वेळा डायलिसिस करावे लागते आणि त्याचा खर्च हा पन्नास हजारापेक्षा जास्त असतो. सामान्य माणूस हा खर्च ऐकूनच मानसिकरित्या संपून जातो. त्यामुळे मी हा निर्णय घेतला असून या सर्व पेशंटला मोफत सुविधा मिळणार आहे. तसेच नवरात्रीमध्ये ब्लड बँक देखील स्थापन करणार आहोत आणि ही ब्लड बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक राहील, असेही ते म्हणाले.



मुंबई: भांडुप पश्चिम येथील सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आर. के. विधी महाविद्यालयाचा दिमाखदार राजेशाही उद्घाटन सोहळा व रमेश खानविलकर यांच्या इंग्रजी जीवन चरित्र Stormy path पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले, राष्ट्रपती नवनियुक्त राज्यसभा सदस्य पद्मश्री उज्वल निकम, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे अध्यक्ष विठ्ठल कोंडे देशमुख, आमदार अशोक पाटील, शिवसेना सचिव राम रेपाळे ,प्रकाशक अक्षय सोन्थालिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.विधी महाविद्यालय उद्घाटन सोहळा व Stormy path या इंग्रजी पुस्तक प्रकाशनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री नितेश राणे, मंत्री आदिती तटकरे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शुभेच्छापत्र देऊन रिद्धेश रमेश खानविलकर यांचे अभिनंदन केले.

## थोडक्यात

### ताडदेव, अंधेरी, घाटकोपरच्या डान्स बारवर छापे

**मुंबई:** मुंबईतील 'सावली' बारवरून राजकारण तापले असतानाच उपनगरांतील अनेक बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली अश्लील नृत्य सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.गेल्या दोन दिवसांत मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकांनी ताडदेव, अंधेरी आणि घाटकोपरमधील नामांकित बारवर छापा टाकून अनेकांची धरपकड केली. या तीनही बारमधून २५ बारबालांची सुटका करण्यात आली असून त्यांच्यावर पैसे उडवत अश्लील नृत्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या जवळपास ६० जणांवर कारवाई करण्यात आली. बारचालक आणि मालक यांच्यावर याबाबत संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ताडदेव येथे नुकत्याच सुरू झालेल्या पुष्पा बारमध्ये असाच प्रकार सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाला मिळाली. पथकाने शुक्रवारी मध्यरात्री या बारवर छापा टाकला. बारमध्ये झाडाझडती घेतली असता १२ बारबाला नृत्य करताना सापडल्या. ३२ ग्राहक त्यांच्या नृत्यावर खुश होऊन पैशाची उधळण करताना आढळले. ग्राहक, कामगार, बारचालक अशा सुमारे ४७ जणांविरुद्ध ताडदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### मलबार हिल कला क्रीडा केंद्राचा वाळकेश्वर येथे बालक-पालक मेळावा

**मुंबई:** वाळकेश्वर मलबार हिल बाणगंगा विभागमध्ये गेले ४४ वर्ष सालाबादा प्रमाणे सामाजिक, शैक्षणिक, कला क्रीडा, साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या "मलबार हिल कला क्रीडा केंद्राने" "ज्ञानयोग" शैक्षणिक मदत योजना अंतर्गत हुशार होतकरु विद्यार्थ्यासाठी बालक पालक मेळाव्याचे आयोजन रविवार १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता केंद्राच्या ग्रंथालयात स्वातंत्र्य सैनिक एस. एम. जोशी मैदान डोंगरशी रोड मलबार हिल येथे करण्यात आला आहे. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन उद्योजक राजेशभाई टांक प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार आहेत. असे केंद्राचे विश्वसत प्रकाश भालेकर यांनी कळविले आहे.

### लॉयड्समधील कर्मचाऱ्यांना करिअर घडविण्याची संधी

**मुंबई:** खाणकाम आणि उत्पादन क्षेत्रातील एक आघाडीची कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी हा नेहमीच ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे. ही कंपनी लोह खनिज उत्पादनापासून डीआरआय मॅन्युफॅक्चरींगच्या व्यवसायात आहे. लॉयड्स मेटल्स आपल्या कर्मचाऱ्यांना 'सर्वात मोठी संपत्ती' मानते, आणि त्यांच्या कामाला महत्त्व देते. कंपनी कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी विविध उपक्रम राबवते, ज्यामुळे एक सकारात्मक आणि उत्साही कामाचे वातावरण तयार होते असे लॉयड्स मेटल्सचे ग्रुप सीएचआरओ वेंकटेसन आर म्हणाले..एम्प्लॉयी स्टॉक ओनरशिप प्लॅन ही एक कर्मचाऱ्यांच्या लाभाकरिता असलेली योजना आहे जी कामगारांना स्टॉकच्या शेअर्सच्या रूपात कंपनीमध्ये मालकी स्वारस्य देते. आजपर्यंत, २७०० हून अधिक कर्मचाऱ्यांना ESOP योजनेचा फायदा झाला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# ओबीसी आरक्षणासह वसई-विरार महापालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा!

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय; निवडणुकांना गती

प्रतिनिधी
■ वसई

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अखेर हिरवा कंदील दाखवला असून वसई-विरार महापालिकेसह राज्यभरातील महापालिका, नगरपालिका, आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. नव्या प्रभागरचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात गेल्या दीड ते दोन वर्षांपासून निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. त्यामुळे राजकीय अनिश्चितता कायम होती. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा तसेच नव्या प्रभागरचनेविरोधातील याचिकांमुळे या निवडणुका अडकल्या होत्या. मात्र आता या अडथळ्यांना सर्वोच्च न्यायालयाने पूर्णविराम दिला आहे.नव्या प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. प्रभाग रचना करण्याचा संपूर्ण अधिकार राज्य सरकारकडेच असल्याचे ठामपणे सांगत न्यायालयाने सरकारच्या निर्णयाला वैध ठरवले आहे. औसा नगरपालिकेच्या हस्तक्षेप याचिकेलाही फेटाळत न्यायालयाने या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले.या निर्णयामुळे वसई-विरार महापालिकेच्या राजकारणात नवचैतन्य संचारले असून निवडणुकीच्या दृष्टीने सर्वच पक्षांनी हालचालींना गती दिली आहे. नव्या वॉर्डरचनेनुसार निवडणुका होणार असल्याने अनेक ठिकाणी राजकीय गणिते बदलण्याची शक्यता असून उमेदवार ठरवताना सर्व पक्षांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता राज्य निवडणूक आयोगाची अधिकृत अधिसूचना अपेक्षित असून त्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला आरक्षण मिळणार असल्याने अनेक वर्षांपासून मागणी करणाऱ्या समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**वसई-विरारमध्ये सत्ताबदल होणार?**

महापालिकेतील सत्तांतरासाठी आतापासूनच भाजप, शिंदे गट, ठाकरे गट, बविआ यांच्यात रस्सीखेच सुरू झाली आहे. गेल्या निवडणुकीपासून बविआकडे असलेली सत्ता राखता येणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर दुसरीकडे नव्या आरक्षणामुळे राजकीय समीकरणेही झपाट्याने बदलणार आहेत.

# जुचंद्र परिसरातील नागरिकांचे संसार पाण्यात

## शहर नियोजनाची जबाबदारी असलेला नगररचना विभाग भ्रष्टाचाराच्या दलदलीत



प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व जुचंद्र परिसरात मुसळधार पावसामुळे साचणारे पाणी वाहून नेण्यासाठी गटाराची तसेच अन्य कोणत्याही पर्यायाची व्यवस्था महापालिका प्रशासनाकडून करण्यात आलेली नसल्याने येथे साचलेले पाणी उपसण्यासाठी अक्षरशः पंपाचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे मुसळधार पावसात येथील नागरिकांचे संसार पाण्यात जात असल्याने त्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे संतापजनक चित्र दिसून येत आहे.

नायगाव पूर्वेतील जुचंद्र परिसरातील जुचंद्र रेल्वे फाटक परिसर, गजानन नगर, प्यारेलाल चाळ, रणचंडिका चाळ, दत्तकृपा चाळ, चंडिका देवी अपार्टमेंट येथील रहिवाशांना मुसळधार पावसामुळे साचलेल्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. सकाळी उठल्यापासून येथील नागरिकांना परिसरात साचलेल्या दुर्गंधीयुक्त घाण पाण्याचा सामना करावा लागतो. महापालिका प्रशासनाने या परिसरात साचलेले पाणी वाहून नेण्यासाठी कोणतीही सक्षम व कायमस्वरूपी उपाययोजना केली नसल्याने पावसाचे पाणी निचरा न होता ते परिसरातच साचून राहिल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच साचलेले पाणी नागरिकांच्या घरादारात जात असल्याने बरेचदा येथील नागरिकांचे संसार विस्कळीत होत असल्याचे दिसून येते. दरम्यान, एखाद्या उन्हाळ्यात तिथे पाऊस झाल्यास पाणी साचण्याची समस्या असते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्येचा सामना करावा लागत आहे. चाकरमानी, विद्यार्थी, लहान मुले या सर्वांना त्याचा त्रास होत आहे. या प्रकाराला महापालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग हे समान पातळीवर जबाबदार असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

वसई -विरार शहर महानगरपालिकेकडून स्वच्छता अभियान राबवले जाते. परंतु जूचंद्र परिसरात दिसून येत असलेली समस्या पाहता पालिकेचे हे स्वच्छता अभियान गेले कुठे? असा संतप्त सवाल नागरिकांनी पालिकेसमोर धरला आहे. तसेच शहर नियोजनाची जबाबदारी असलेला महापालिकेचा नगररचना विभागच भ्रष्टाचाराच्या दलदलीत सापडला असल्याचे सध्याच्या ईडी चौकशीवरून दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या हितासाठी पालिका प्रशासन किती काळजी वाहत आहे, त्याचे प्रभावी चित्र दिसून येत असून प्रत्येक पालिका अधिकारी केवळ टक्केवारी घेण्यातच धन्यता मानत असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

# शेल्टी येथे पाणंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड



प्रतिनिधी
■ डहाणू

पर्यावरण रक्षण ही काळाची गरज लक्षात घेऊन निकणे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील शेल्टी महसूल गावात शासनाच्या "शत पाणंद रस्ते योजना" अंतर्गत एक उल्लेखनीय उपक्रम राबवण्यात आला. पाणंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी जांभूळ व सिसम या उपयुक्त वृक्षांची वृक्षलागवड करण्यात आली.या उपक्रमामध्ये ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

उपस्थित मान्यवरांची उपस्थितीने मिळाला संस्थात्मक पाठिंबा या कार्यक्रमाला महसूल विभाग आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभले. उपस्थित मान्यवरांमध्ये पुढील अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.मंडळ अधिकारी देविदास चौरे,सचिन तुंबडा तलाठी,अंकिता वायडा तलाठी,दिलीप बरफ तलाठी,ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी व स्थानिक नेतृत्व पुढे सरसावले विद्यमान उपसरपंच सुदाम मेरे,माजी सरपंच दशरथ दळवी,अविनाश दळवी पेसा समिती अध्यक्ष,विजय गोधाले या सर्वांनी या उपक्रमाला नैतिक आणि प्रत्यक्ष पाठिंबा देत उपस्थिती दर्शवली. स्थानिक नेतृत्वाने पुढाकार घेतल्यामुळे हा उपक्रम केवळ सरकारी योजना न राहता समूहभावनेतून राबवलेली चळवळ ठरली.पर्यावरण संवर्धनाचा संदेश या उपक्रमातून परिसरात हरित पट्टा निर्माण होणार असून, येणाऱ्या पिढ्यांना पर्यावरणाचा समतोल राखण्याचा वारसा लाभणार आहे."एक झाड लावा – जीवन वाचवा" या संदेशास अनुसरून राबवलेली ही वृक्षलागवड तलासरी तालुक्यासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# नायगाव पूर्वेतील खड्डेयुक्त रस्त्यांविरोधात ठाकरे सेना रस्त्यावर

## खड्ड्यात झाडे लावून पालिकेचा नोंदवला निषेध




प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरात मुख्य रस्ते खड्डेयुक्त बनले असून वाहतूकदारांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खड्ड्यांच्या समस्येमुळे वाहतूक कोंडीचे विघ्न उभे राहिले असून विद्यार्थी, चाकरमानी, महिला, वृद्ध या सर्वांनाच इच्छित स्थळी जाण्यासाठी विलंब लागत आहे. तसेच स्थानिक रिक्षाचालकांच्या व्यवसायावर गदा आली आहे. या संदर्भात काही दिवसांपूर्वीच नायगाव पूर्व परिसरातील ठाकरे गटाचे नायगाव पूर्व- पश्चिम शहरप्रमुख मंगेश चव्हाण यांनी रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात झाडे लावण्याचा इशारा पालिकेला दिला होता. त्यानुसार सोमवारी दिनांक ४ ऑगस्ट रोजी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून खड्ड्यांमध्ये झाडे लावून ढोल वाजवून महापालिका प्रशासनाचा अनोखा निषेध नोंदविला. या आंदोलनामुळे एक तास परिसरात वाहतूककोंडी निर्माण झाली होती.

सोमवारी ठाकरे गटाने वामन ढाबा ते टीवरी रेल्वे फाटक व नायगाव ते बापाने या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत सदरचे आंदोलन केले. नायगाव पूर्व परिसराची लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढू लागली आहे. येथील नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यात महापालिका प्रशासनाने हात आखडता घेतला आहे. तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देखील येथील महत्त्वाच्या रस्त्यावर केवळ थुकपट्टी लावण्यातच धन्यता मानली जात आहे. खड्डेयुक्त रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत होते. तसेच अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. याबाबत ठाकरे गटाचे नायगाव पूर्व- पश्चिम शहरप्रमुख मंगेश चव्हाण यांनी महापालिका प्रशासनाला खड्ड्यात झाडे लावण्याचा इशारा काही दिवसांपूर्वी दिला होता. त्यानुसार सोमवारी रिलॅबल समोर ठाकरे गटाचे कार्यकर्ते पदाधिकारी हे मोठ्या संख्येने नायगाव पूर्व परिसरात रस्त्यावर एकत्र उतरले होते. त्यांनी ढोल वाजवून पालिका प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा निषेध नोंदवत खड्ड्यांमध्ये झाडे लावली. या निषेध आंदोलनामुळे परिसरात वाहतूककोंडी निर्माण झाली होती. परंतु या आंदोलनाचा धसका पालिका प्रशासन घेणार, असा विश्वास ठाकरे गटाने व्यक्त केला आहे.या आंदोलनात जिल्हा प्रमुख प्रविण म्हाप्रळकर, तालुका प्रमुख प्रथमेश राऊत, जिल्हा संघटक शशी भूषण शर्मा, जिल्हा ग्रामीण संघटक किरण म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख जनार्दन म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नालासोपाऱ्यात ठाकरे गटाला मोठा धक्का माजी नगरसेवक स्वप्निल बांदेकर शिंदे गटात



प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नालासोपारा परिसरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक स्वप्निल बांदेकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. सोमवारी मनोर येथील सायलेंट रिसॉर्टमध्ये पार पडलेल्या शिंदे गटाच्या बैठकीत बांदेकर यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. त्यामुळे नालासोपाऱ्यात शिंदे गटाचे पारडे जड झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

स्वप्निल बांदेकर हे २०१५ ते २०२० दरम्यान शिवसेनेचे नगरसेवक होते. फूट पडल्यानंतर त्यांनी ठाकरे गटाची निष्ठा राखली होती. मात्र मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाकडून खंडणी मागितल्याच्या आरोपाखाली झालेली अटक आणि त्यानंतर घडलेला राजकीय प्रवेश या दोन्ही घटनांमुळे स्थानिक राजकारणात नवी कलाटणी मिळाल्याचे चित्र आहे. यापूर्वी हिट अँड रन प्रकरणातील आरोपी राजेश शहा यांना गटात सामावून घेतल्यानंतर आता बांदेकरांचा प्रवेशही शिंदे गटाच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. तथापि आगामी महापालिका निवडणुकीसाठी शिंदे गट आपली ताकद वाढवण्याच्या तयारीत असून नालासोपाऱ्यातील ही भर त्यांना निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

मनोर येथे पार पडलेल्या पक्षीय बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी पालघर जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र फाटक, जिल्हाप्रमुख निलेश तेंडोलकर, आमदार विलास तरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या प्रवेशामुळे वसई-विरारमध्ये ठाकरे गटाच्या नेतृत्वाला नवी रणनीती आखावी लागणार आहे.



**मुंबई: इंदिरा नगर शिवडी पूर्व मधील अंतर्गत रस्त्याचे सिमेंट काँक्रिटिकरण करून देण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी शाखेत येऊन केली होती त्यानुसार माजी नगरसेवक सचिन पडवळ यांनी पुढाकार घेऊन शिवसेना शाखा क्रमांक २०६ च्या वतीने स्व खर्चाने ६ रेडी मिक्सर आणून १८०० फूट रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करून देण्यात आले. यावेळी स्थानिक शाखाप्रमुख बैजू हिंदोळे तसेच इंदिरा नगर परिसरातील शाखेचे पदाधिकारी तसेच नागरिक देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. निधी उपलब्ध नसताना देखील स्थानिक नागरिकांची गरज ओळखून स्व खर्चाने काम करून दिल्याबद्दल त्यांनी शिवसेना शाखा क्रमांक २०६ चे आभार मानले.**

# शाळेची वाट चिखलात हरवली, सरकार मात्र अडकले पाहणीत



प्रतिनिधी
■ तलासरी

२०१४ मध्ये विकासाच्या गजरात ठाणे जिल्ह्यापासून वेगळं करण्यात आलेलं पालघर – उद्दिष्ट होतं आदिवासीबहुल भागाचा स्वतंत्र विकास. पण आज, ११ वर्षांनंतरही अनेक गावं आणि पाडे मूलभूत सुविधांसाठी झगडत आहेत. तलासरी तालुक्यातील बेंडगपाडा हे त्याचं सर्वात ज्वलंत उदाहरण ठरतंय.

अनविहीर गावाच्या पश्चिमेला, कालू नदीच्या पलीकडे वसलेला बेंडगपाडा, हे केवळ एक आदिवासी पाडा नाही, तर तथाकथित 'विकासाच्या' ढोंगी गप्पांवर उठलेला कटु सवाल आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही या भागात ना पक्का रस्ता, ना स्वच्छ पिण्याचं पाणी, ना आरोग्य सुविधा. वीज आहे, पण ती सुद्धा ५००-७०० मीटर लांबून, स्वतःच्या खर्चाने आणावी लागते. मानवी हक्कांच्या बाबतीत या पाड्याचं नाव अजूनही यादीच्या शेवटीच आहे.

"आम्हाला शाळेत जायला रस्ता द्या!" – ही घोषणा नाही, तर कपडे मळले म्हणून शाळेत न जाता चिखलातून परत फिरणाऱ्या एका बालकाचा हंबरडा आहे.

शाळा हे या मुलांचं स्वप्न आहे. पण त्या स्वप्नासाठी दररोज कालू नदी पार करणं, पावसात धोका पत्करणं आणि चिखल, घसरण, अपघात यांचा सामना करणं… हे त्यांच्या जीवनाचं वास्तव बनलं आहे.

गर्भवती महिला आणि आजारी वृद्धांसाठी ही परिस्थिती आणखीन गंभीर आहे – कारण रस्ता नाही, वाहन पोहचत नाही, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत. हा एक सामाजिक अन्याय आहे, आणि आदिवासी समाजाच्या अस्तित्वावर थेट आघात आहे.

**सरकारकडून आश्वासनं कृती मात्र शून्य!**

ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून निवेदने दिली, प्रशासनाचे दरवाजे ठोठावले, पण उत्तरात मिळालं फक्त "लवकरच पाहणी करू" असं आश्वासन. दरवर्षी कोट्यवधींच्या आदिवासी विकास योजनांचे आकडे सांगितले जातात – पण बेंडगपाड्यात एकही विकासाचा फावडा चाललेला नाही. शासनाचे अधिकारी आणि राजकीय मंडळी निवडणुका जवळ आल्या की फक्त पाहणी करतात आणि नंतर पुन्हा पाड्यावर मौन आणि अंधार परततो. "आम्हाला शाळेत जायला रस्ता द्या… आमच्या आयुष्याचा रस्ता आम्ही तयार करू!" हे शब्द एका पिढीच्या अपेक्षांचा आक्रोश आहे. शासनाच्या जाहिरातींच्या गोंडस दाव्यांवर आणि योजनांच्या दिखाव्यावर हा एक करारी झणझणीत चपराक आहे. जर सरकार बेंडगपाड्याला जोडणारा पक्का रस्ता देऊ शकत नसेल, तर जनता लवकरच तुमच्या राजकीय रस्त्यांचं खोदकाम सुरू करेल!

**जाहीर प्रगटन**

अर्जदार :- **जुज़र शब्बीर कपाड़िया**

विरुध्द

गैरअर्जदार :- निबंधक जन्म-मृत्यु नोंदणी तथा वैद्यकीय अधिकारी ई-वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, १०, शेख हाफीझुद्दीन मार्ग, आशाधाम कॉलनी, भायखळा (पुर्व) मुंबई - ४०० ००८.

बनाम :- सर्व नागरीक

अर्जदार :- **श्री. जुज़र शब्बीर कपाड़िया** यांनी त्यांचा वडील **कै. शब्बीर हुसैन कपाड़िया** यांचा मृत्यु दिनांक **6/1/2023** रोजी **वेळ** वाजता, **मृत्यु ठीकाण** मुंबई (कस्तूरबा अस्पताल) येथे झालेला असल्याने व सदरच्या जन्माची नोंदणी अभिलेख उपलब्ध नसल्याने व त्यांचा जन्माची नोंद गैरअर्जदार उपनिबंधक तथा वैद्यकीय अधिकारी, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, ई-वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, १०, शेख हाफीझुद्दीन मार्ग, आशाधाम कॉलनी, भायखळा (पुर्व) मुंबई- ४०० ००८ यांचे अभिलेखावर घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म- मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) चे अंतर्गत तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, करमणुक कर विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी कोणाचेही हितसंबंध असल्यास अथवा कोणासही आक्षेप हरकत घ्यायावयाचा असेल तर हा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या **तारखेपासुन १५ दिवसाचे** आत किंवा नेमलेल्या तारखेच्या आंत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत आक्षेप म्हणने लेखी स्वरुपात कळवाव्यात तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणीही योग्य हरकत / आक्षेप / म्हणने दाखल न केल्यास सदरहू कार्यालय अर्जदारास त्यांनी मागणी केलेली मृत्युच्या/जन्माच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज लागलीच पुरावा घेऊन अर्ज निकाली काढण्यात येईल, मंजुर नामंजुर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**जुज़र शब्बीर कपाड़िया**

**कार्यालयाचा पत्ता** :- तहसिलदार, करमणुक कर विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ३ रा मजला, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

**Sd/-**
**(राजेश ब. वैष्णव)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुंबई शहर**

**Lost & Found**

Notice is hereby given that the Certificate(s) for the under mentioned Equity Shares of the Company have been lost / misplaced and the holder(s) / purchaser(s) of the said Equity Shares have applied to the Company to issue duplicate Share Certificate(s).
Any person who has a claim in respect of the said Shares should lodge the same with the Company at its Registered Office within 21 days from this date else the Company will proceed to issue duplicate certificate(s) to the aforesaid applicants without any further intimation.
Folio No.S88190, Name of Shareholder Suresh Vasant Thakur, Bharti Suresh Thakur,No.of Shares- 48, Distinctive Nos.- 38309491-3809538,Certificate Nos.- 172702
Name of the Share Holders
Suresh Vasant Thakur
Bharti Suresh Thakur
Dated - 30-07-2025
Ultratech Cement
B-WING AHURA CENTRE 2ND FLOOR, MAHAKALI CAVES ROAD, ANDHERI EAST, MUMBAI MH IN 400093.

**जाहीर सुचना**

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात की, सौ. संध्या जयराम गावड राहणार कोलवडी, डोंगरपाडा, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर तर्फे कुळमूखत्यारपत्र धारक श्री. जयराम नारायण गावड यांनी मौजे मिरे, तालुका व जिल्हा ठाणे येथील सर्वे नंबर ८६, हिस्सा नंबर २ बाबतचा फेरफार क्र. २८२६ रद्द करुन मिळण्याकामी ठाणे येथील मा. उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे समोर आरटीएस अपील कमांक २०४/२०२४ अपील दाखल केले आहे.

प्रस्तूत अपीलातील जमिन मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे

| गावाचे नाव | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|
| मिरे | ८६ | २ | ००-१६-९० |

प्रस्तूत प्रकरणी खालील सामनेवाले यांस खालील नमूद पत्यावर तलाठी / रजिस्टर ए.डी / पोस्टाने नोटीस पाटविण्यात आल्या होत्या. परंतू सदर सामनेवाले यांनी नोटीस घेण्यास नकार दिल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर आरटीएस अपीलाची पुढील सुनावणी दिनांक ०७/०८/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय ठाणे येथे ठेवण्यात आली आहे.

प्रस्तूत अपील प्रकरणात खालील नमूद सामनेवाले यांनी अथवा हितसंबधीत व्यक्ती यांनी नेमून दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्यक त्या कागदपत्रांसह न चुकता हजर रहावे. याची नोंद घ्यावी.

**सामनेवाले यांचे नाव**
**मे. आर आर बिल्डर्स**
पत्ता - ग्रिन कॉम्पलेक्स, तळ मजला,
ए बिल्डींग, अल्फा हॉटेल जवळ,
मिरा गाव, काशिमिरा, तालुका व जिल्हा ठाणे.
**दि. ०५.०८.२०२५**

**अपीलकारांचे वकील**
**(ॲड. पंढरीनाथ पांडुरंग पाटील)**

**जाहीर सुचना**

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात की, सौ. संध्या जयराम गावड राहणार- कोलवडी, डोंगरपाडा, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर तर्फे कुळमूखत्यारपत्र धारक श्री. जयराम नारायण गावड यांनी मौजे मिरे, तालुका व जिल्हा ठाणे येथील सर्वे नंबर २७, हिस्सा नंबर २ बाबतचा फेरफार क्र. २८२१ रद्द करुन मिळण्याकामी ठाणे येथील मा. उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे समोर आरटीएस अपील कमांक २०५/२०२४ अपील दाखल केले आहे.

प्रस्तूत अपीलातील जमिन मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे

| गावाचे नाव | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|
| मिरे | २७ | २ | ००-५९-१० |

प्रस्तूत प्रकरणी खालील सामनेवाले यांस खालील नमूद पत्यावर तलाठी / रजिस्टर ए.डी. / पोस्टाने नोटीस पाटविण्यात आल्या होत्या. परंतू सदर सामनेवाले यांनी नोटीस घेण्यास नकार दिल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर आरटीएस अपीलाची पुढील सुनावणी दिनांक ०७/०८/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय ठाणे येथे ठेवण्यात आली आहे.

प्रस्तूत अपील प्रकरणात खालील नमूद सामनेवाले यांनी अथवा हितसंबधीत व्यक्ती यांनी नेमून दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्यक त्या कागदपत्रांसह न चुकता हजर रहावे. याची नोंद घ्यावी.

**सामनेवाले यांचे नाव**
सामनेवाले क्र. ७ मे. डिवाईन असोशिएट्स
पत्ता १०६, गुरु नानक नगर, कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ४०० ०५९.
**दि. ०५.०८.२०२५**

**अपीलकारांचे वकील**
**(ॲड. पंढरीनाथ पांडुरंग पाटील)**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty**
**Issu - 45**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे**
**अंक - ४५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## भाजप अल्पसंख्याक मोर्चातर्फे निकम यांचा सन्मान

**मुंबई :** मुंबई भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वसीम खान यांच्या नेतृत्वाखाली, भाजपा कार्यकर्त्यांनी पद्मश्री पुरस्कार विजेते अधिवक्ता उज्ज्वल निकम यांची भेट घेतली आणि राज्यसभेत खासदारपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी, मुंबई भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे सरचिटणीस आग्नेलो फर्नांडिस, उपाध्यक्ष मौलाना अब्दुल बारी खान, उत्तर पश्चिम जिल्हा अध्यक्ष हुसैन पठाण, चांदिवली विधान १५८ वॉर्ड अध्यक्ष हरेंद्र सिंह, बशीर खान, आदिल खान, संजय मौर्य, शशी मौर्य, शाहनवाज पठाण, वसीम खान उपस्थित होते.



# युतीचे काय करायचे ते माझ्यावर सोडा, मतभेद मिटवा आणि कामाला लागा!

### राज ठाकरे यांचे मनसैनिकांना आदेश



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युतीबाबत योग्य वेळी सांगेन . युतीचे काय करायचे? ते माझ्यावर सोडा . मात्र, आपापसातील मतभेद मिटवा आणि कामाला लागा, असे आदेश राज ठाकरे यांनी दिले आहेत. इतकेच नाही तर मराठीचा मुद्दा घराघरात पोहोचवा, ते करत असताना हिंदी भाषिकांचा द्वेष करु नका, अशा सूचना देखील त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या. कोणालाही न घाबरता आत्मविश्वासाने काम करा. नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त होतील, त्यांना स्वीकारा, असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी केले आहे. वीस वर्षानंतर आम्ही भाऊ एकत्र येऊ शकतो, मग तुम्ही का भांडता? असा प्रश्न देखील राज ठाकरे यांनी विचारला आहे. मुंबई महानगर पालिका निवडणुकीत मनसे १०० टक्के सत्तेत येणार असल्याचा दावा देखील राज ठाकरे यांनी केला.

आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाचे प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युती बाबत अद्याप थोडी प्रतीक्षा करण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, २० वर्षांनंतर आम्ही दोघे भाऊ एकत्र येऊ शकतो, तर तुम्ही का भांडता? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी मतभेद मिटवून एकत्र येण्याच्या सूचना सर्वांना केल्या आहेत.

**मुंबई महानगर पालिकेवर येणार मनसेचीच सत्ता**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सर्वात महत्त्वाची मानली जाणारी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी कामाला लागण्याच्या सूचना राज ठाकरे यांनी दिल्या आहेत. तसेच मुंबई महानगर पालिकेवरील सत्तेत मनसे देखील सहभागी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यासाठीच मराठीचा मुद्दा घरोघरी पोहोचवण्याच्या सूचना त्यांनी पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

> ' मराठीचा मुद्दा घराघरात पोहोचवा, ते करत असताना हिंदी भाषिकांचा द्वेष करु नका,कोणालाही न घाबरता आत्मविश्वासाने काम करा.'
>
> **- राज ठाकरे ,मनसे अध्यक्ष**

## मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मागणी

# गणेशभक्तांच्या सोयीसाठी गणेशोत्सवात रात्री उशिरापर्यंत लोकल आणि मेट्रो सुरु ठेवावी!

### जनतेच्या मागणीसाठी रेल्वे आणि मेट्रो प्रशासनासोबत पाठपुरावा करणार



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र आणि मुंबई एमएमआर परिसरात साजरा होणारा गणेशोत्सव जगप्रसिद्ध असून रात्री उशिरापर्यंत गणेशभक्त दर्शनासाठी येत असतात अशा वेळी गणेशभक्तांसाठी लोकल आणि मेट्रो सुरु ठेवावी, यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. महापालिकेच्या ग्रांट रोड येथील डी विभाग कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते.

गणेशोत्सवा दरम्यान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गणेशभक्त मुंबई परिसरात दाखल होतात. या स्थितीत भक्तांच्या सोयीसाठी सार्वजनिक वाहतूक सुरु असणे अतिशय महत्वाचे आहे. त्यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाशी पत्र व्यवहार सुरु असल्याची माहितीही मंत्री लोढा यांनी जनता दरबारात दिली.

प्रशासकीय यंत्रणा राबवून थेट जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे.त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत,अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील सदस्यांना केली होती.या सूचनेला अनुसरूनच या जनता दरबाराचे आयोजन केल्याचे मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले.

गेल्या महिनाभरात दक्षिण मुंबईत झालेल्या पाच जनता दरबारात ऑनलाईन आणि ऑफलाईन मिळून सुमारे २ दोन हजार नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. नागरिकांच्या नागरी समस्या सोडवण्यासाठी म्हाडा, एस. आर. ए. महापालिका आणि रेल्वे सह बारा विभागांचे अधिकारी एकाच छताखाली आणण्यात आले. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे न मारता जागच्या जागी त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे शक्य झाले असल्याचेही लोढा यांनी सांगितले.

**संक्रमण शिबीर झाल्याशिवाय रहिवाश्याना घर रिकामे करण्याची नोटीस देऊ नये !**

जनता दरबारात अनेक नागरिकांनी म्हाडा संबंधित पुनर्विकास,दुरुस्ती आणि संक्रमण शिबीर संदर्भात तक्रारी मांडल्या होत्या. अनेकदा नागरिकांना संक्रमण शिबिराची सोय न करता इमारती रिकाम्या करण्यासाठी सी टूच्या नोटीस देण्यात आल्या होत्या. या संबंधित रहिवाश्यांची बाजू मंत्री लोढा यांनी ऐकून घेतली.यासंदर्भात म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जायसवाल यांच्या सोबत लवकरच बैठक घेणार असून संक्रमण शिबीर झाल्याशिवाय रहिवाश्याना घर रिकामे करण्याची नोटीस देऊ नये,अशी सूचना करणार असल्याची माहिती लोढा यांनी यावेळी दिली.तसेच संक्रमण शिबीर तयार नसल्यास त्वरित इमारतीची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा असेही त्यांनी स्पष्ट केले.

# हिंदीला मराठी भाषेच्या अगोदर ओळख मिळाली - शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्रात हिंदीच्या कथित सक्तीविरोधात रान पेटले असताना शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी यासंबंधी एक वादग्रस्त दावा करत या वादाच्या आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. हिंदी भाषेला मराठी भाषेच्या अगोदर ओळख मिळाली. त्यावेळी महाराष्ट्र अस्तित्वातही नव्हता, असे ते म्हणालेत. अविमुक्तेश्वरानंद यांनी काही दिवसांपूर्वीच ठाकरे कुटुंब हे बिहारमधून महाराष्ट्रात स्थलांतरीत झाल्याचा दावा केला होता हे विशेष.

महाराष्ट्रात हिंदीच्या सक्तीवरून रान पेटले आहे. या प्रकरणी मनसे व ठाकरे गटाने कडाडून विरोध केल्यानंतर महायुती सरकारने यासंबंधीचा जीआर मागे घेतला. पण त्यानंतरही या वादाची धग कमी झाली नाही. या पार्श्वभूमीवर शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी उपरोक्त विधान केले आहे. अविमुक्तेश्वरानंद म्हणाले की, हिंदी भाषेला केव्हा ओळख मिळाली? मराठीला केव्हा ओळख मिळाली याचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, हिंदी भाषेला आपल्या देशात राजभाषा म्हणून त्या अगोदर ओळख मिळाली. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले तेव्हा मराठी भाषेला राज्यभाषा म्हणून ओळख मिळाली, असे ते म्हणाले.

# बोरिवलीच्या झाशीची राणी तलावात बुडून मुलाचा मृत्यू

### भाजपचे पालिकेविरोधात आंदोलन



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बोरीवली (पश्चिम) येथील झाशीची राणी उद्यानातील तलावात रविवारी एका मुलाचा दुःखद मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या तलावाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात महानगरपालिकेच्या निष्काळजीपणाबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या तलावाची योग्य देखभाल, सुरक्षा भिंत बांधणे आणि सुरक्षा कर्मचारी नेमण्यासाठी माजी खासदार गोपाल शेट्टी यांनी महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी अनेक वेळा पत्रव्यवहार केला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठकांच्या मालिकेतून ते अनेक वेळा आंदोलन करण्यासही गेले होते. परंतु महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या तलावात डूबून होणाऱ्या मृत्यूंची संख्या वाढतच राहिली आहे.

रविवार, ३ ऑगस्ट रोजी या तलावात एका मुलाच्या मृत्यूची दुःखद बातमी समजताच गोपाळ शेट्टी तात्काळ घटनास्थळी गेले. त्यांनी दिवंगत मुलाच्या कुटुंबीयांसोबत संवेदना व्यक्त केली आणि नंतर शेकडो कार्यकर्त्यांसोबत एमएचबी पोलीस स्टेशनला जाऊन जबाबदार महानगरपालिका अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकारच्या जीवघेण्या घटना थांबवण्यासाठी सावधानता बाळगणे आणि जबाबदार व्यक्तींना शिक्षा देण्याची मागणी घेऊन गोपाळ शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाने प्रशासनाला हादरवून सोडले. यावेळी बोरीवलीचे भाजप आमदार संजय उपाध्याय यांच्या सह अनेक माजी नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# घाटकोपर रेल्वे स्टेशन परिसराची रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षांनी केली पाहणी



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रेल्वे मंत्रालय मार्फत सद्या मुंबईतील सर्व रेल्वे स्टेशन चे कायापालट करण्याचे काम सुरु असून या कामांची पाहणी करण्यासाठी रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षांनी रविवारी घाटकोपर स्टेशनला हजेरी लावली होती. रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार यांनी घाटकोपर रेल्वे स्थानकाला भेट देऊन गर्दी आणि स्टेशनच्या पुनर्बांधणीसाठी सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. स्टेशनव्यतिरिक्त अधिकाऱ्यांनी घाटकोपर रेल्वे स्थानक आणि मेट्रो स्थानकाची कनेक्टिव्हिटी देखील पाहिली.

अलिकडेच घाटकोपर रेल्वे आणि मेट्रोच्या अनियंत्रित गर्दी आणि सुरक्षेबद्दल एक बातमी प्रसिद्ध झाली होती. पाहणीनंतर अधिकाऱ्यांनी स्टेशन परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती घेतली आणि अधीनस्थ अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. घाटकोपरसारख्या गर्दीच्या स्थानकावर मेट्रोची गर्दी गोंधळ निर्माण करते. जास्त गर्दीमुळे कधीही मोठी दुर्घटना घडू शकते. दररोज अंदाजे २ ते ३ लाख प्रवासी स्टेशनवरून जातात त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी मेट्रो सुटल्यावर प्लॅटफॉर्मवर गर्दी वाढते. घाटकोपरमध्ये मेट्रोशी लोकल ट्रेनचा थेट संपर्क असल्याने, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, वसई, विरार येथे जाणारे प्रवासी आता दादरऐवजी घाटकोपर स्थानकावर उतरणे पसंत करतात, त्यामुळे घाटकोपर स्थानकावरील गर्दी वाढली आहे. या समस्येबाबत, स्थानिक आमदार पराग शाह यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, एमएमआरडीए, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी), कार्यकारी संचालक (एम. डी.) यांना पत्र लिहून समस्येची माहिती दिली आहे. त्यानुसार त्यांनी दौरा दरम्यान या सर्व समस्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी आरपीएफ चे वरिष्ठ अधिकारी संजय वर्मा, ब्रिजेश कुमार आदिसहित अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**ॲक्सिस फायनांस लिमिटेड**
(सीआयएन: एल६५९२१एमएच१९९५पीएलसी२१२६७५)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०२५.
AXIS FINANCE

**ई - लिलाव विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ (१) च्या तरतूदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, २००२ च्या अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषत: कर्जदार / गहाणदार आणि हमीदार ह्यांना सुरक्षित धनको ह्यांच्याकडे गहाण/ भारीत करण्यात आलेल्या येथे खाली नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा ॲक्सिस फायनांस लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतला असून कर्जदार/ गहाणदार/ हमीदार म्हणजेच **१) नेमचंद अल्गो स्वर्णकर (कर्जदार / हमीदार), (२) पुष्पादेवी नेमचंद स्वर्णकार (सह कर्जदार), (ह्यानंतर संयुक्तपणे "कर्जदार" असा संदर्भ असलेले)** ह्यांच्याकडून ॲक्सिस फायनांस लिमिटेडला २३ जुलै २०२५ अनुसार देय असलेल्या **रु. ९१,९८,२४६/- (रुपये एक्क्याणव लक्ष अठ्याणव हजार दोनशे सेहेचाळीस मात्र)** अधिक त्यावरील करारानुसार देय असलेल्या व्याजाचा सह थकीत **रु. १,५१,३०,०८० (रुपये एक कोटी एकावन्न लक्ष तीस हजार ऐंशी मात्र)** ची वसुली करण्यासाठी **१३ ऑगस्ट २०२५ रोजी "जसे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे" आणि "जेथे आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्वावर"** करण्यात येणार आहे.

| परिशिष्ट - I |
|---|
| ई-लिलावाचा तपशिल |
| मालमत्ता |
| चा सर्व खंड आणि भूखंड: गाव पाचपाखाडी, तालुका आणि जिल्हा ठाणे, हाजुरी वागळे इस्टेट, ठाणे पश्चिम, जिल्हा ठाणे ४००६०४ येथे वसलेल्या अंतिम प्लॉट क्र. १०४, सब प्लॉट क्र. २, टि.पी.एस. क्र. धारण केलेला सर्वे क्र. ३८२, हिस्सा क्र. १ सुसंगत सी. टी. एस. १२१७ मूळ प्लॉट क्र. २०२, वर बांधण्यात आलेल्या साई श्रद्धा अपार्टमेंट च्या ७ व्या मजल्यावरील ५२० चौ. फू. मोजमाप असलेल्या सदनिका क्र. ७०३ ची मालमत्ता. |

| परिशिष्ट II | |
|---|---|
| ई-लिलावाचा तपशिल | |
| मालमत्ता | |
| मालमत्ता/ त्तांचे वर्णन | परिशिष्ट – I अनुसार |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | दिनांक : १३/०८/२०२५ रोजी<br>वेळ: स. ११:०० वा. पासून दु. १२:०० वा. पर्यंत<br>प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह |
| बोली सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ | दिनांक : ०८/०८/२०२५ रोजी सायं ४:०० वा. पूर्वी |
| राखीव मूल्य: रु. ३६,४५,०००/- (रुपये छत्तीस लक्ष पंचेचाळीस हजार मात्र)<br>*किंमत ज्याच्या खाली सदनिका/ मालमत्ता/तांची विक्री केली जाणार नाही. | |
| इसारा रक्कम ठेव (आरपी च्या १०%): रु. ३६४५००/- (रुपये तीन लक्ष चौसष्ट हजार पाचशे मात्र) | |
| बोली वाढ रक्कम: रु. १,००,०००/- (रुपये एक लक्ष मात्र) | |
| संपर्क व्यक्ती तपशिल आणि मोबा क्र: | सुश्री. राधिका अगरवाल ८६०४९७४२०१<br>सुश्री. सृष्टी अगरवाल : ७७३८६५००२१ |

विक्रीच्या संदर्भात तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया https://www.axisbank.com/auction-notices आणि/ किंवा https://axisbank.auctiontiger.net वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या. (लिलाव आयडी वर नमूद करण्यात आला आहे.)

| सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत संवैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना |
|---|
| नमूद कर्जाच्या कर्जदार/ रां, हमीदार / रां आणि गहाणदार/ रां ना उपरोक्त नमूद दिनांकाला होणाऱ्या ई-लिलाव विक्रीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत सूचना असल्याचे समजण्यात यावे. |

दिनांक : ०५ ऑगस्ट २०२५
ठिकाण : मुंबई

सही/- प्राधिकृत अधिकारी
ॲक्सिस फायनांस लिमिटेड

**नवी मुंबई महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./17/2025-2026**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

| अनु. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | झाडाचा प्रकार | एकूण तोडणे | एकूण स्थलांतरीत | झाड तोडणे/ स्थलांतरीत करावयाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती अनिता आनंद पालवे, श्रीजी कृपा को.ऑ. हौ.सो., प्लॉट नं.142, रुम नं.01, सेक्टर-21, नेरुळ, नवी मुंबई | नारळ | 1 | 0 | सदरच्या झाडांमुळे मालमत्तेचे नुकसान होत असल्याने एकुण 01 नग झाड तोडणे. |
| | | **एकुण** | **1** | **0** | |

**सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात बी विभाग कार्यालय, भुखंड क्र.पी-8 व पी-9, कुकशेत से.14, नेरुळ, नवी मुंबई या विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक 05 / 08 /2025.**

सही/-
**(किसनराव पलांडे)**
**उप आयुक्त (उद्यान परि-1)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/344/2025**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**E-Tenders are invited on line from experienced and reputed Manufacturers/Suppliers/Contractors for the supply/ works of following at Gas Turbine Power Station, Uran:**

| e-Tender / RFx No. | Description | Estimated Cost/ EMD (Rs) | Sale Period | Last date of submission (up to 11.00 hrs) |
|---|---|---|---|---|
| RFx No. 3000058926 | Work of cleaning proposed project land by removing grass, shrubs, bushes and cutting down fallen trees, trimming of branches at GTPS, Uran. | 18.70 Lakhs<br>22,205/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |
| RFx No. 3000058928 | Work of complete overhauling of stage II Diesel Engine set at GTPS, Uran. | 04.72 Lakhs<br>8,220/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |
| RFx No. 3000059035 | Design, Supply, Erection and Commissioning of 220KV circuit breaker, isolators control & relay panel as per existing (OGM) panel at 220KV switchyard GTPS, Uran. | 39.80 Lakhs<br>43,300/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| Rfx No. 3000059120 | Supply of Shaker Table for vibration sensor calibration, at GTPS, Uran. | 09.20 Lakhs<br>12,700/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| RFx No. 3000059232 | Supply of various Electronic Modules for Gas Turbines, at GTPS, Uran. | 21.86 Lakhs<br>25,363/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| RFx No. 3000060164 | Supply Position Feedback Transmitters for Motorised Actuators at GTPS, Uran. | 11.96 Lakhs<br>15,463/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| RFx No. 3000060231 | Supply of field temperature transmitters for flue gas temperature monitoring on stack at GTPS, Uran. | 02.46 Lakhs<br>5,960/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| RFx No. 3000060232 | Repairing and Servising of various Electronics modules/cards installed at TIC GTPS, Uran. | 03.82 Lakhs<br>7,320/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |
| RFx No. 3000060268 | Annual work contract for analysis of various effluent, potable water samples, hazardous waste samples at GTPS, Uran. | 0.76 Lakhs<br>2,295/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |
| RFx No. 3000060367 | Supply of Inductive threaded barrel proximity sensors (proximity switch) with Harting connector for steam turbine ESV at GTPS, Uran. | 05.94 Lakhs<br>9,448/- | 05.08.2025 To 24.08.2025 | 25.08.2025 |
| RFx No. 3000060407 | Hiring of Two number of school Buses for the school going wards of GTPS employees for the period of two years. (Two Year AMC) | 68.30 Lakhs<br>71,809/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |
| RFx No. 3000060410 | Work of ACC fan access door repairs at GTPS, Uran. | 03. 27 Lakhs<br>6,771/- | 05.08.2025 To 18.08.2025 | 19.08.2025 |

Tender Cost Rs. 1180/- for all tenders. Tender cost and EMD to be paid online only. Tenders are available for sale on our website from dt. **05.08.2025** for more details, pl. visit our website **https://eprocurement.mahagenco.in.** Contact Details:- EE (P&C) - 91-9167007841.

Vendors are requested to register their firms for E-Tendering,
**Please log on to our website https://eprocurement.mahagenco.in**

**Sd /-**
**Chief Engineer**
**GTPS Uran**

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**

म्हाडा MHADA

**निविदा सुचना क्र. १५ (२०२५-२६)**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी. एम. सी. फ-दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई- ४०००१२ यांचेकडे म्हाडा / सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी. पी. डब्ल्यू. डी / एम. आय. डी. सी. / बी.पी.टी./एम. ई. एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१ फॉर्ममध्ये [ टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या उपकरप्राप्त इमारती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निवीदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | उपकरप्राप्त इमारत क्र. ९३ - ए, खटाव टॅरेस, डॉ एस. १. एस. राव रोड, लालबाग, मुंबई, या इमारतीचे दुरुस्ती काम करणे [मंडळ निधीचे काम ] | ७,२५,१६७.०० | ७,२५२.०० | १५०००.०० | ५९०.०० | दि.०५/०८/२०२५ ते दि. १२/०८/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १३/०८/२०२५ ते दि. १४/०८/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / के.सा. बां.वि / रेल्वे / बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत /शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. दु. व पु. मंडळ यांच्या नावावर द्यावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ [द] विभाग, फ [द] विभाग तिसरा मजलाए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मुंबई - १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे को - या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफ्यामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. १४/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी. एस. टी. अंतर्भुत नाही. 12. जी. एस. टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
12. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे

CPRO/A/ 636

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ [द] विभाग**
**मुं.इ.दु. व पु. मंडळ**

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था  Follow us : mhadaofficial

> ज्या माणसाचा मित्र आणि नोकर जुना असेल, तो माणुस 'माणुस' म्हणून चांगला आहे, असं समजावं.



- सलीम खान
प्रसिद्ध चित्रपटलेखक

वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५

# नशाधुंदांना लगाम

राज्य सरकारने अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर मोक्का लागू करणार असल्याचे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जाहीर केले. या ड्रग्ज व्यापारात अल्पवयीन मुलांना गुंतवून त्यांचा माध्यम म्हणून वापर करून कायद्यातील कमकुवतपणाचा लाभ घेतला जात आहे. यासाठी आता 16 वर्षांच्या अल्पवयींनाही अटकेच्या कक्षेत आणले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले होते. परंतु, आजच्या आधुनिक युगात ओठावर धड मिसरूडही न फुटलेल्या कोवळ्या वयातील युवा पिढीला चरस, गांजा आदी अमली पदार्थ मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई, वसई, विरार ते अगदी राज्याच्या शहर आणि ग्रामीण भागांत सहजपणे मिळू लागले आहेत, याच्या खोलात जाण्याचा प्रयत्न सरकार आणि पोलिस प्रशासन करेल? गेल्या काही वर्षांत विविध छापेसत्रांत लाखो, कोटींचा अमली पदार्थांशी संबंधित माल पोलिसांकडून जप्त केला जात आहे, अशा बातम्या रोजच आपल्या वाचनात येतात. पण, मुंबई, ठाणे या महानगरांपुरत पाहायचं झाल्यास शाळा, कॉलेज, झोपडीपासून पॉश वसाहतींच्या परिसरात तरुणाईच्या जीवनाची दशा करणारा हा नशेचा पदार्थ इतका सहज का आणि कसा मिळू लागला या चिंतेने समाजातील प्रत्येक जागरूक नागरिकांच्या मनात घर केले आहे. ऐंशी, नव्वदच्या दशकात मुंबईतील बिल्डरलॉबीला आपल्या मुठीत ठेवण्यासाठी दिवसाढवळ्या रक्तरंजित खेळ खेळणाऱ्या अंडरवर्ल्डचा धागादोरा या नशेच्या व्यापारात आहे का? या नशेच्या व्यापाराचे प्रत्येक वेळी निरनिराळे कनेक्शन लागत आहे. आधीच जीवघेणी रील्सबाजी, ऑनलाइन गेम्सच्या विळख्यात तरुण पिढी पूर्णपणे गुरफटत चालली आहे त्याला नशेच्या बाजाराने आणखीनच हवा दिल्याची परिस्थिती आहे. संस्कारी पिढी घडविण्याचा इतिहास असलेल्या महाराष्ट्रात विडीकाडी, दारू, सिगारेटला स्पर्शही करू नकोस असा धाक आणि दम आपल्याला वडिलधाऱ्यांकडून भरला जातो. मात्र, आपला मुलगा किंवा मुलगी किती पुढारलेली आहे हे सांगण्याच्या प्रयत्नात हे काय झालं, असे म्हणत आपल्याच तोंडात मारून घेण्याची वेळ अनेकांवर आली आहे. ड्रग्जचे सेवन करणाऱ्या एका नशेबाज मुलासोबत संबंध ठेवणाऱ्या 19 वर्षीय मुलीची आईनेच गळा आवळून हत्या केली. वांद्रे येथील एका चाळीत घडलेल्या या प्रकाराने समाजमन पुरत हादरून गेलं होतं. 40 वर्षीय महिला घरकाम करून आपली मुलगी आणि तिच्या लहान भावाला शिक्षण देत कुटुंबाचा गाडा हाकत होती. मात्र, आपली मुलगी एका नशेबाजाच्या फंदात पडली आहे, हे समजल्यानंतर तिने रागाच्या भरात हे कृत्य केलं. अशा एक ना अनेक घटना आहेत ज्यामुळे तरुण पिढीच्या आयुष्याची राखरांगोळी होत आहे. आपल्या महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत वाढलेला ड्रग्जचा व्यापार पाहता हा देशविघातक कारवायांचा भाग आहे, या संशयालाही वाव निर्माण झाला आहे. सामान्यातील सामान्यांपासून धनिकांच्या घरापर्यंत पोहोचलेलं अमली पदार्थांचे व्यसन कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त करायला निघाले आले आहे. येत्या काळात अमली पदार्थाच्या आहारी गेल्यानं युवा पिढी आणि त्यांचे घर कुटुंबीय नैराश्याच्या गर्तेत लोटण्याचं प्रमाण वाढल्यास कुणालाच नवल वाटायला नको, हे वास्तव कुणालाच नजेरआड करता येणार नाही. सिगारेट पिणे हे आरोग्यासाठी हानिकारक, घातक आहे, असा वैधानिक इशारा सिगारेटच्या पाकिटावर दिलेला असतो. त्यानंतरही तंबाखू सेवनामुळे कर्करोगासारख्या महाभयंकर आजाराने ग्रस्त लोक मृत्यूच्या दारात लोटले जात आहेत. तीच गत अमली पदार्थांचं सेवन आपलं आणि आपल्या कुटुंबियांचं जीवन अंधकारात लोटेल याची कोणतीही चिंता नशेचा चस्का लागलेल्यांना सतावत नाही. उलट ते अधिकाअधिक याच व्यसनाच्या विळख्यात गुरफटत जातात. सांगली जिल्ह्यातील कुपवाड, इरळी आणि कार्वे या तीन ठिकाणी अलीकडेच ड्रग्ज निर्मितीचे तीन कारखाने आणि करोडो रुपयांचे ड्रग्ज मिळून आले होते. काही दिवसांपूर्वी पुण्याजवळच्या चाकण औद्योगिक वसाहतीत ड्रग्ज उत्पादन करणारा एक भला मोठा कारखाना आढळून आला होता. सोलापूर जिल्ह्यातील कुडूवाडी, सातारा शहर आणि इस्लामपूर येथेही मोठ्या प्रमाणात ड्रग्जचे साठे मिळून आले होते. या सगळ्या बाबी विचारात घेता राज्यातील बहुतांश मोठ्या शहरात आणि ग्रामीण भागालाही ड्रग्जची लागण झाल्याची लक्षणे दिसत आहेत. विशेष म्हणजे ज्या भागात ड्रग्जचे कारखाने थाटले जात आहेत, तिथल्या स्थानिक नागरिकांना आणि पोलिसांनाही त्याचा थांगपत्ता लागू दिला जात नाही. इतका बेमालूपणे आपल्या समाजात फोफावत चालेला हा घातक नशाव्यापार अजगराप्रमाणे आपली समाजव्यवस्था गिळकृंत करण्यासाठी निघाला आहे. नशाधुंदांना आपण नशेत नेमके काय करत आहोत, याचही भान राहत नसल्यानं गेल्या काही वर्षांत चोरी, बलात्कार किंवा खून अशा गुन्हेगारीचा आलेखही उंचावत चालल्याचं अनेक घटनांतून समोर येतं. ड्रग्जची चटक लागलेली एखादी व्यक्ती सुरुवातीला काही दिवस सतत उत्साही दिसते, पण नंतर अवघ्या काही दिवसांतच त्या व्यक्तीची झोप व भूक गायब होते, हाडाची काडे होताना दिसू लागतात, कायम चिडचिड, रागावून कुणावरही भडकणे, सततची डोकेदुखी, अचानक रक्तदाब वाढणे किंवा कमी होणे, ताप येऊन धाप लागणे आणि अचानकपणे अंग गार पडणे अशी लक्षणे दिसू लागतात. ड्रग्जच्या आहारी गेलेली व्यक्ती ड्रग्ज मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकते. खिशात पैसे नसतील तर चोरी करतील, मारामारी करतील, खोटे बोलतील, आणखी काही म्हणजे काहीही करतील; पण कधी एकदा ड्रग्ज मिळवून त्याची चव चाखतो, असे त्यांना होते. बाल आणि कुमार वयात पैशांचा फारसा खुळखुळाट न पाहिलेली एक पिढी पाच ते दहा पैशांना मिळणाऱ्या लिमलेटच्या गोळ्या खावून शाळेत जाताना आनंदोत्सव साजरा करत होती. परंतु, आज शहर आणि ग्रामीण भागातील शालेय आणि कॉलेज जीवनातील परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. परिस्थितीचे चटके सोसत शिक्षण घेणाऱ्या पालकांना आपला पाल्य सुस्थितीत शाळा, कॉलेजात जायला हवा. त्याला पॉकेट मनी म्हणून चांगले पैसे देण्याची परंपरा नवीन युगात रूढ झाली. या पॉकेट मनीचा उपयोग आणि दुरुपयोग अशा एका नाण्याच्या दोन बाजू सामाजिक चिंतनाचा विषय बनला. नैसर्गिक आणि प्रक्रियाकृत असे ड्रग्जचे दोन प्रकार मानले जातात. नैसर्गिक ड्रग्जमध्ये प्रामुख्याने अफू, चरस आणि गांजा यांचा समावेश होतो. ही चरस गांजाची आगार आपल्या महाराष्ट्रात आणि देशात असल्यानं गांजा सहजासहजी आणि मुबलक मिळत असल्याने युवापिढी मोठ्या प्रमाणात 'गांजाडू' होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. गेल्या काही दिवसांत खेड्या-पाड्यांतील युवापिढी नशाधुंद झाल्याचे पाहायला मिळत आहे. एकूणच या नशेच्या गोळीने आपलं सामाजिक स्वास्थ बिघडवून टाकलं असून मायबाप सरकार, पोलिस प्रशासनाने हा नशेचा व्यापार वेळीच न रोखल्यास त्याचे वाईटातील वाईट परिणाम समाजापुढं येतच राहणार आहेत.

# वर्दीतील हुकुमशाही...




**एका मुलीचा सासरी छळ होतो म्हणून ती मराठवाड्यातील एका शहरातून निघून पुण्यात येते. सासरच्या लोकांच्या विरोधात रितसर तक्रार नोंदवते आणि महिला आश्रमात दाखल होण्याच्या अगोदर एका रात्रीपुरती तीन मुलींकडे त्यांच्या खोलीवर राहण्याची अनुमती मागते. त्या तीन मैत्रिणी तिला आपल्या खोलीवर एक रात्र ठेवून घेतात. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून ती मुलगी निघून जाते.**

पण या दोन दिवसापूर्वी घडलेल्या कहाणीचा खरा ट्विस्ट असा आहे की, मराठवाड्यातून आलेल्या आणि त्या तीन मुलींच्या घरी एक रात्र थांबलेल्या त्या मुलीचे सासरे माजी पोलीस अधिकारी असतात. त्यांचे राजकीय लागेबांधे आहेत. त्यामुळे आपली ताकद वापरून काही पोलिस अधिकाऱ्यांना घेऊन ते मराठवाड्याहून तडक पुणे येथे दाखल होतात.

त्या तीन मुलींच्या खोलीवर धाड घातली जाते. त्यांचे मोबाईल तपासले जातात. त्यांच्या खोलीतील कपडे, अंर्तवस्त्र साऱ्याची तपासणी केली जाते. कुठलेही वॉरंट नसताना बेकायदेशीरपणे त्या मुलींना कोथरूड पोलीस चौकीमध्ये आणले जाते. पाच तास तेथे त्यांना डांबून ठेवले जाते. जेथे सीसीटीव्ही कॅमेरा नाही अशा खोलीमध्ये त्यांना बसवले जाते आणि त्यांचा कबुलीजवाब घेतला जातो.

त्या तीन मुलींमधील एकजण नोकरीला गेलेली असते तर नोकरीच्या ठिकाणाहून तिला वॉरंट नसताना सर्वांसमक्ष पोलीस गाडीत बसवून पोलीस चौकीवर आणलं जातं. यामुळे त्या मुलींचे घरमालक त्यांना ताबडतोब खोली खाली करा, असा तगादा लावतात.


पोलीस चौकीवर नेल्यानंतर त्या मुलींना "तुम्ही महार- मांगाच्या आहात म्हणून असं वागताय, तुम्ही रांडा आहात," असं त्यांना कोथरूड पोलिस स्टेशनच्या PSI प्रेमा पाटील व संभाजीनगर पोलिस स्टेशनच्या कॉन्स्टेबल संजीवनी शिंदे, तसेच PSI अमोल कामटे ऐकवतात. पुढील शब्दांमध्ये त्यांना धमकावले जाते, "तुम्ही महार-मांगाचे असेच असता, तुझ्या रूमवर मुलं येतात, त्या सगळ्यांसोबत तू झोपत असशील, तुला माय बापाने टाकून दिलंय, तू उलट उत्तर देतेस. तुझा हा अॅटीट्यूडआहे तर एक दिवस कुणीतरी तुझा मर्डर करेल. तू नीट जगूच शकणार नाही, तू अशीच मरशील, तुला करिअरमध्ये कधीतरी कॅरेक्टर सर्टिफिकेट लागेल. तुझ्यासारख्या मुलीला आम्ही कॅरेक्टर सर्टिफिकेट देणार नाही, करिअर बरबाद होईल." "तुम्हा मुलींचे स्कार्फ सारखे आहेत म्हणजे तुम्ही समलिंगी संबंधात आहात, " असेही त्यांना ऐकवलं जातं. या मुलींना लाथाबुक्क्यांनी मारलं जातं. त्यांच्या मोबाईलमधील फोटो पाहून मोठ्यांनी व्हाट्सअपवरचे मेसेजेस वाचून गलिच्छ शब्दांमध्ये कमेंट केल्या जातात. या मुलींचा कसलाही गुन्हा नसताना हे सर्व घडलेलं आहे. अॅट्रॉसिटीखाली FIR नोंदवून घ्या, असं वारंवार सांगूनही कृती केली जात नाही. मध्यरात्रीच्या साडेतीनपर्यंत त्यांना तसंच बसवलं जातं. सकाळी साडेदहापासून पिडीत मुली आणि त्यांच्यासह समाजसेविका श्वेता पाटील आणि कार्यकर्ते कोथरूड पोलीस स्टेशनला बसून असतात. शेवटपर्यंत FIR नोंदवून घेतला जात नाही.

एक सज्ञान महिला घरामधून निघून जाते आणि तीन सज्ञान महिलांच्या घरी त्यांच्या आणि स्वतःच्या मर्जीने एक रात्र राहते या सगळ्यांमध्ये कुठे गुन्हा घडलेला आहे ? आणि गुन्हा घडलेला नसताना त्यांना पोलीस चौकीमध्ये नेऊन जातीवाचक शिव्या आणि मारहाण करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शोषितांची एकजूट किती आवश्यक बनलेली आहे ते नव्याने सांगायला नको !

**लीना पांढरे, नाशिक**

**(लेखिका नाशिकमधील इंग्रजी विभागाच्या माजी विभागप्रमुख व माजी प्राचार्या आहेत.)**

# मित्र कोणास म्हणावे?



**दिलीप मालवणकर**

**आपल्या** देशात ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा केला जातो. या दिनाचे उगमस्थान (perugve) पेरूग्वे हा देश आहे. १९५८ पासून सुरू झालेला हा मैत्री दिन जागतिक पातळीवर साजरा होऊ लागला. या दिवशी मित्र मैत्रिणी एकमेकांना शुभेच्छा देतात. भेट वस्तुही देतात. त्यामागे आपली मैत्री चिरंतन राहो! हीच भावना असते.

या दिवसाला प्रोत्साहन देण्यात शुभेच्छा पत्रे तयार करणाऱ्या उद्योजकांचा मोठा वाटा आहे. या दिवशी शुभेच्छा पत्रे, भेटवस्तू देण्याची प्रथा रूढ झाल्याने जागतिक बाजारपेठेत कोट्यावधीची उलाढाल होते. असंख्य लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

सन २०११ साली संयुक्त राष्ट्राने ३० जुलै हा दिवस "जागतिक मैत्री दिन" साजरा करण्याचा (एका ठरावाद्वारे) निर्णय जाहीर केला. विविध देशातील लोकांत, जाती, धर्म, वंशाबाबत असलेले भेदभाव दूर होऊन "मैत्र भाव" निर्माण व्हावा, हा या मागचा उदात्त हेतू असावा.

आताच्या अत्याधुनिक वा पुढारलेल्या जगात मैत्री दिनाचे celebration हे एखाद्या इव्हेंट प्रमाणे केले जाते. मुळ मैत्री भावनेला धक्का न लावता मैत्री दिन साजरा करायला हरकत नसावी. परंतू अनेक वेळा याला विकृत स्वरूप प्राप्त होते. मैत्रीचा चुकीचा अर्थ काढून गैरप्रकार होतात. ते कटाक्षाने टाळले गेले पाहिजेत. मैत्री कशी असावी ? याचे उदाहरण कृष्ण व सुदामाच्या मैत्रीवरून स्पष्ट होते. कृष्णाला त्याच्या श्रीमंतीचा गर्व नव्हता तर सुदामाला त्याच्या गरिबीची लाज वाटत नव्हती. गरीब सुदामा कृष्णाच्या भेटी वेळी काय घेऊन गेला तर - पोहे. आपला मित्र इतका मोठा राजा आहे त्याला पोहे कसे घेऊन जाऊ? याचा त्याने विचार केला नाही. ज्यावेळी सुदामा कृष्णाच्या भेटीसाठी गेला, तेव्हा त्याला प्रवेशद्वारावर रोखण्यात आले. तेव्हा तो बोलला- तुमच्या राजाला सांगा, तुमचा मित्र 'सुदामा' आला आहे. ही वार्ता कळताच कृष्ण आपले राजेपण विसरून स्वतः प्रवेशद्वारावर सुदामाचे स्वागत करायला आला. त्याची गरिबी दर्शवणारी वस्त्र पाहून तो मागे हटला नाही. राजवस्त्रे परिधान केलेल्या कृष्णाने आपल्या मित्राची गळाभेट घेतली. तेव्हा लोकांना काय वाटेल, याचा विचारही त्याला स्पर्शून गेला नाही. पुढे सुदाम्याने आणलेले पोहे त्याने आवडीने खाल्ले. हाच खरा मैत्रीभाव असतो. नाहीतर आजकाल उच्च पद प्राप्त होताच अधिकारी आपल्या जन्मदात्यांना ओळखत नाहीत. मित्रांना टाळतात.

"जो आपल्या मित्राची अडचण न सांगता ओळखतो" तोच खरा मित्र.असे म्हणतात की, जो मित्र भरपावसातही आपल्या मित्राच्या डोळ्यातील अश्रू पाहू शकतो, तोच खरा मित्र. मित्राची अडचण ओळखून जो मित्राच्या याचनेची प्रतीक्षा न करता मदत करतो, तोच खरा मित्र असतो. मित्र संकटात असताना मदत करतोच परंतू मित्राच्या पश्चात जो त्याच्या परिवाराचीही काळजी घेतो,तोच खरा मित्र असतो. मित्राच्या श्रीमंतीचा वा राजकीय पदाचा लाभ घेण्याचा जो प्रयत्नही करीत नाही, तोच खरा मित्र.

मैत्री ही फक्त माणसाशीच करता येते का? निसर्गही आपला मित्र असू शकतो, आपण जोपसलेले छंद हे देखील आपले मित्र बनू शकतात, पाळीव प्राणीही सहवासाने आपले मित्र बनतात,वाचन, गायन, संगीत, नृत्य, अभिनय, हे ही आपले मित्र बनू शकतात. मैत्रीसाठी हवे असते सुध्द आचरण, पवित्र भावना व परस्परावरील दृढ विश्वास. संकट समयी जो धावून येतो तो खरा मित्र, आनंदाचे क्षण द्विगुणित करतो तो मित्र, दुःखात अश्रू पुसून सांत्वन करतो तो मित्र. आपली स्तुती करीत असताना जो आपले दोष दाखवून आपली कानउघडणी करतो, तोच आपला मित्र. वाममार्गांवर जाण्यापासून रोखतो व सन्मार्गावर नेतो तोच खरा मित्र. मित्र व मैत्रीची खोली समुद्राहून खोल असते.मैत्रीच्या लाटेवर स्वार झालात की आयुष्य कसे कापसा सारखे हलके व गुलाबासारखे सुगंधित होऊन जाते.

अश्या या मैत्री दिनाच्या माझ्या असंख्य मित्रांना हार्दिक शुभेच्छा. तुम्ही आहात म्हणून जगण्यात मजा आहे.

# अनुसूचित क्षेत्र (पेसा)

भारताच्या संविधानामध्ये अनुच्छेद 244 मध्ये 5 व्या व 6 व्या अनुसूचिमध्ये "अनुसूचित क्षेत्राची" तरतुद समाविष्ट करण्यात आली आहे. अनुच्छेद 243 ड मधील तरतुदीनुसार संविधानातील भाग 9 मधील पंचायतीसंबंधीच्या तरतूदी अनुसूचित क्षेत्राला लागू होत नाही. पाचव्या अनुसूचितील तरतुदींनुसार अनुसूचित क्षेत्राचे प्रशासन व नियंत्रण तसेच या क्षेत्रावर संसद व विधिमंडळाने केलेले कायदे लागु करणे, अथवा अपवाद व फेरबदलासह कायदे लागू करण्याचे अधिकार राज्यपालांकडे विहीत आहे. असे अनुसूचित क्षेत्र रद्द करणे, घोषित करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार मा. राष्ट्रपती यांना आहे.

**अनुसूचित क्षेत्राची पार्श्वभूमी –** माँटेग्यू – चेम्सफोर्ड (1918) समितीने पहिल्यांदाच आदिवासींच्या प्रश्नावर विचार केला आणि त्यांना प्रांतीय सरकारमधून वगळण्याचा निर्णय घेतला. पुर्णपणे वगळलेले क्षेत्र लहान होते तर अंशत: वगळलेले क्षेत्र अधिक विस्तृत होते आणि त्यांना राज्यपाल आणि गव्हर्नर जनरल कौंसिल यांच्या संयुक्त जबाबदारीवर सोपविण्यात आले होते. माँटेग्यू – चेम्सफोर्ड समितीने सुचविले होते की, आदिम जमातीची लोकवस्ती असलेले क्षेत्र प्रस्तावित राजकीय सुधारणामधून वगळले जावे आणि प्रांताच्या गव्हर्नरद्वारे प्रशासित केले जावे. त्या नुसार भारत सरकार कायदा,1919 द्वारे पूर्णत: आणि अंशत: वगळलेले क्षेत्र असे दोन भाग केले गेले.

सायमन कमिशन 1928 (पहिला वैधानिक आयोग) – आदिवासींच्या समस्येने भारतीय वैधानिक आयोगाचे (सायमन कमिशन) लक्ष वेधून घेतले. सायमन यांच्या दृष्टीने आदिवासी भागातील लोक राजकीयदृष्ट्या प्रगत झालेले नव्हते. आदिवासींना जमिनीच्या मालकीची सुरक्षा, अधिनतेपासून संरक्षण आणि त्यांची उपजिवीका आणि पारंपारिक रितीरीवाजाचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आवश्यक होते. सायमन कमिशनला असे वाटले की, या लोकांना शिक्षण देण्याचे कर्तव्य मिशनरी किंवा वैयक्तिक अधिकारी यांच्यावर सोडले जाऊ शकत नाही.

**सायमन कमिशनच्या शिफारशी–** शैक्षणिक आणि कल्याणकारी उपक्रमांसाठी शासनाने निधी राखून ठेवावा. ही क्षेत्रे पूर्णतः किंवा अंशतः वगळण्याची सूचना केली. त्यानुसार भारत सरकार कायदा, 1935, अनुसूचित जिल्हे पूर्णतः किंवा अंशतः वगळलेले मानले गेले. भारत सरकार कायदा, 1935 च्या कलम 91 अन्वये याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली.

**अनुसूचित क्षेत्राची व्याप्ती –** 5 व्या अनुसूचित समाविष्ट 10 राज्ये, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ़, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओरीसा, राजस्थान आणि तेलंगना, 6 व्या अनुसूचित समाविष्ट 4 राज्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोराम, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र (13 जिल्हे) पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदूरबार, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली.

**अनुसूचित क्षेत्राचे निकष –** एखादे क्षेत्र, आदिवासी लोकसंख्येचे प्राबल्य 50 टक्क्यांपेक्षा कमी नसावे; कॉम्पॅक्टनेस आणि क्षेत्राचा वाजवी आकार जिल्हा, तालुका यासारखी व्यवहार्य प्रशासकीय संरचना आणि शेजारच्या भागाच्या तुलनेत या भागाचे आर्थिक मागासलेपण.

**महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र –** मा. राष्ट्रपती महोदयांची अधिसूचना दि. 2 डिसेंबर, 1985 अन्वये घोषित. 73 वी घटना दुरुस्ती – पंचायतीराज पद्धतीला बळकट करणारी 73 वी घटना दुरुस्ती 24 एप्रिल 1993 पासून अंमलात आली. 73 व्या घटना दुरूस्तीने संविधानाच्या भाग 9 मध्ये पंचायती संबंधी तरतूदींचा समावेश करण्यात आला. मात्र या तरतूदी अनुच्छेद 243 ड नुसार अनुसूचित क्षेत्राला लागू होत नव्हत्या.

**- रविंद्र माने**
**उपविभागीय अधिकारी, राजुरा**

## पत्र मानस

### अकरावी प्रवेशाचा घोळ कधी संपणार?

दहावीचा निकाल लागून दोन महिने झाले तरी मुंबईत अकरावीच्या प्रवेशाचा घोळ अजून सुरू आहे. चौथ्या फेरी नंतरही मुंबई विभागातून विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले नाहीत. ब-याच विद्यार्थ्यांचे प्रवेश अजून व्हायचे आहेत.असे दर वर्षी का होते? सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत तोपर्यत अकरावीचे वर्ग सुरु होणार का? नव्या प्रवेशप्रक्रियेत सुव्यवस्थित नियोजन, गतिमान प्रक्रिया आणि सर्वांना समान संधी देण्याच्या धोरणात शिक्षण विभाग नापास झाले आहे.ज्या त-हेने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या त्या पाहता अनुभवी यंत्रणेकडे प्रवेश प्रक्रियेची जबाबदारी दिलेली नव्हती.प्रवेशाबाबतची अनिश्चितता,भविष्याची चिंता आणि वाया जाणारा वेळ यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे.शिक्षण विभागाच्या दिरंगाईमुळे पालकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची भावना पालकांमध्ये प्रबळ होत आहे. सध्याच्या कासवगती आणइ तांत्रिक अडचणी पाहता अकारावीच्या प्रवेशप्रक्रिया पूर्ण होण्यास सप्टेंबर उजाडेल. प्रवेशप्रक्रियेतील अडथळे दूर करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## ल'अतेलिया 1664 चा शिवान-नरेश डिझायनर जोडीसोबत सहयोग

**ठाणे :** ल'अतेलिया 1664 (L'Atelier 1664) या फ्रेंच ब्रॅण्डने भारतातील प्रख्यात लग्झरी फॅशन डिझायनर्स शिवान भाटिया आणि नरेश कुकरेजा यांच्या सोबत सहयोगाची घोषणा केली आहे. हे दोघेही त्यांच्या चैतन्याने सळसळणाऱ्या रचनात्मकतेसाठी ओळखले जातात. ल'अतेलिया 1664 शिवान अँड नरेश या खास मर्यादित आवृत्ती कॅप्सुल कलेक्शनच्या माध्यमातून हा सहयोग प्रत्यक्षात येत आहे. ल'अतेलिया या फ्रेंच शब्दाचा अर्थ 'स्टुडिओ' असा होतो. ल'अतेलिया 1664 आणि शिवान अँड नरेश यांच्यासह योगाने तयार झालेल्या संग्रहामध्ये वैभव व विरंगुळा यांचे सार सामावले आहे.



### महत्त्वाचे

## बदलापुरात ऐन पावसाळ्यात पाणी कपात लागू

**बदलापूर:** बदलापूर शहराच्या महावितरणाच्या खेळखंडोब्याचा परिणाम बदलापुरकरांवर झालेला असताना त्याचा फटका शहरातील पाणी व्यवस्थेलाही बसला आहे. त्यातच गेल्या तीन महिन्यांपासून पडणाऱ्या पावसामुळे पाण्याची गढुळता वाढली आहे. त्यात नव्याने उभारण्यात आलेल्या जवाहरलाल नेहरू बंदर ते बडोदे महामार्गाच्या उभारणीत झालेल्या खोदकामातील माती जलवाहिन्यांमध्ये शिरल्याने त्याची क्षमता २० टक्क्यांनी कमी झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने बदलापुरात भर पावसाळ्यात आठवड्यातून एक दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. बदलापूर आणि अंबरनाथ शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो. या दोन्ही शहरांची पाणीपुरवठा योजना जवळपास १०० वर्ष जुनी आहे.

## अंध, अपगांसाठी तीन हात नाका येथे सुगम्य सिग्नल

**ठाणे :** पूर्व द्रुतगती महामार्गावरील अत्यंत वर्दळीच्या असलेल्या तीन हात नाका सिग्नल परिसरात अंध आणि अपंगाना रस्ता ओलांडता यावा यासाठी ठाणे महापालिका आणि वाहतुक पोलिसांच्या माध्यमातून सुगम्य सिग्नल यंत्रणा बसविण्यात आला आहे. पादचाऱ्यांसाठी सिग्नल सुरू झाल्यास अंधांना आवाज ऐकू जाणार आहे. त्यामुळे रस्ता ओलांडणे त्यांना सोपे होणार आहे. तर अपंगांसाठी देखील येथे पदपथ बनिवण्यात आले आहेत. या सुगम्य सिग्नलचे उद्घाटन सोमवारी झाले. अंध- अपगांनी या सुगम्य सिग्नलबाबत समाधान व्यक्त केले. पूर्व द्रुतगती महामार्गावरील तीन हात नाका चौक हा अत्यंत महत्त्वाचा आहे. याच चौकातून मुलुंड, वागळे इस्टेट, नौपाडा, हरिनिवास, घोडबंदरच्या दिशेने वाहनांची वाहतुक होत असते. त्यामुळे दिवसाला हजारो हलकी आणि जड वाहने या मार्गावरून वाहतुक करतात. तीन हात नाका भागात रहिवासी आणि वाणिज्य क्षेत्र आहे. त्यामुळे सिग्नल परिसरातून पादचाऱ्यांचीही वर्दळ अधिक असते. यात अंध आणि अपंग व्यक्तिंचाही सामावेश असतो. तीन हात नाका हा सिग्नल ठाण्यातील सर्वात मोठ्या सिग्नलपैकी एक आहे.

# ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी तातडीने दूर करा- एकनाथ शिंदे

### वाहतूक कोंडीबाबत उपमुख्यमंत्री शिंदेंनी व्यक्त केली नाराजी



**प्रतिनिधी**
■ ठाणे

ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा. तसेच, रस्ते तातडीने दुरुस्त करून खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यात येत असलेल्या अपयशाबद्दल स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली.

ठाण्यात कोपरी, माजिवडा यासोबत घोडबंदर रस्ता, गायमुख घाट ते फाउंटन हॉटेल, शिळफाटा परिसर येथे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्यावेळी होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्याबद्दलच्या तक्रारी वारंवार येत असून सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा पूर्ण परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत दिले.

या बैठकीस ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट आदी अधिकारी उपस्थित होते. गायमुख घाटातील रस्त्यामुळे वाहतूक कोंडी सातत्याने होत असून या समस्येवर अजूनही तोडगा काढण्यात यश आलेले नाही. याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर, वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून ठाणे, भिवंडी, शिळफाटा आणि कोपरी या चारही भागातील वाहतूक कोंडीवर मात करावी. रस्ते दुरुस्ती करताना त्या कामाचा दर्जा चांगला असावा. रस्त्यावर दुरुस्तीचे उंचवटे तयार होऊ नयेत. त्याने अपघात होतात, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. खड्डे मुक्ती झाल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. त्यामुळे उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरून खड्डे मुक्ती करावी, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# बदलापुरातील डॉक्टरला एटीएसकडून अटक

### दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा संशय



**प्रतिनिधी**
■ बदलापूर

बदलापूरमधील एका डॉक्टरला एटीएसने ताब्यात घेतलं आहे. या डॉक्टरवर दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा आरोप आहे. उत्तर प्रदेशच्या एटीएसने बदलापूरमध्ये येऊन या डॉक्टरला ताब्यात घेतलं. बदलापूरमधील एका प्रसिद्ध खासगी रुग्णालयात हा डॉक्टर कार्यरत होता. या घटनेमुळे बदलापूरमध्ये खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाने म्हणजेच एटीएसनं बदलापूर शहरातून एका व्यक्तीला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. बंदी घातलेल्या सिमी या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. ताब्यात घेतलेली व्यक्ती डॉक्टर असल्याची माहिती समोर आली आहे.

ओसामा शेख असं एटीएसने ताब्यात घेतलेल्या डॉक्टरचे नाव आहे. तो बदलापूर पूर्वेकडील एका खासगी रुग्णालयात होमिओपॅथिक डॉक्टर म्हणून कार्यरत होता. एटीएसने ओसामा शेखला ताब्यात घेतल्यानंतर त्याला उल्हासनगर न्यायालयात कस्टडीसाठी हजर केले. उत्तर प्रदेश एटीएसने केलेल्या या कारवाईमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. आता या डॉक्टरच्या चौकशीनंतरच त्याचा खरंच दहशतवादी संघटनेशी संबंध होता की नाही याची माहिती समोर येईल.

# डान्स बारची तोडफोड करणाऱ्या मनसैनिकांना कोर्टाकडून जामीन

### 8 जणांची तुरुंगातून सुटका

**प्रतिनिधी**
■ पनवेल

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शेकापच्या मेळाव्यातून भाषण करताना पनवेलमधील डान्सबारचा उल्लेख केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात पनवेलमध्ये सर्वाधिक डान्सबार असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, पनवेलमधील मनसे कार्यकर्त्यांनी येथील नाईड राईड डान्सबारची मध्यरात्री तोडफोड केली होती. या तोडफोडप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक केली होती. मात्र, आता आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्यांची तुरुंगातून सुटका होत आहे. दरम्यान, राज ठाकरे यांची महायुतीसंदर्भात (Mahayuti) गेल्या काही महिन्यातील बदलली भूमिका देखील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे. कारण, डाव्या विचारांच्या शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनाला मनसेप्रमुख राज ठाकरे प्रमुख पाहुणे होते.

राज ठाकरेंच्या शेकापच्या कार्यक्रमातील भाषणात पनवेलमधील डान्स बारचा उल्लेख आल्यानंतर आणि त्यांच्या इशारानंतर मनसे कार्यकर्त्यांनी पनवेल येथील नाईट रायटर या डान्स बारची तोडफोड केली होती.

# श्रावणी सोमवार निमित्त नवी मुंबईतील शिव मंदिरांमध्ये हिवताप / डेंग्यूबाबत जनजागृती

**प्रतिनिधी**
■ नवी मुंबई

श्रावण महिना हा सण – उत्सवांचा महिना म्हणून ओळखला जातो. श्रावण महिन्यात मोठया प्रमाणावर व्रतवैकल्ये केली जातात. विशेषत्वाने श्रावणी सोमवारच्या दिवशी शिवमंदिरांमध्ये नागरिकांची मोठया प्रमाणावर गर्दी असते.

त्यामुळे श्रावणी सोमवारच्या दिवशी शिवमंदिरांमध्ये आरोग्यविषयक शिबीरे आयोजित केल्यास नागरिकांमध्ये मोठया प्रमाणावर जनजागृती होईल हे लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार आरोग्य विभागाच्या वतीने महापालिका क्षेत्रातील 17



शिवमंदिरांमध्ये हिवताप, डेंग्यू व साथीच्या आजारांबाबत माहिती व उपाययोजना देणारी आरोग्य शिबीरे आयोजित करण्यात आली होती.

या 17 ठिकाणी 8419 नागरिकांनी भेट देऊन प्रात्यक्षिकांसह माहिती जाणून घेतली. तसेच 185 नागरिकांचे रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आले. नवी मुंबईकर नागरिकांनी आरोग्य विभागामार्फत करण्यात येणा-या डास प्रतिबंधात्मक व जनजागृती कार्यवाहीसोबतच आपल्या घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणेबाबत जागरुकता दाखवली तर नवी मुंबई शहरात हिवताप / डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल. तरी त्यादृष्टीने नागरिकांनी याविषयी जागरुक राहून सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# श्रावणी सोमवारी ऐतिहासिक शिवमंदिरात भाविकांची अलोट गर्दी

■ शहापूर

शहापूर तालुक्यातील खर्डी परिसरातील दहिगाव येथील ऐतिहासिक शिवमंदिरामध्ये श्रावणी सोमवारनिमित्त शिवभक्तांची आणि भाविकांची अलोट गर्दी होते. या मंदिरासमोर पेशवेकालीन कमळ तलाव आहे. या तलावामुळेच या मंदिराला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले असून हा तलाव भाविक भक्तांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे.

सभोवताली जॉगिंग ट्रॅक बनविला आहे. येथे ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी देखील आसन व्यवस्था असून भाविकांना तलावात उतरण्यासाठी घाट बनविण्यात आला आहे. या ठिकाणी पार्किंग, तसेच स्वच्छतागृहे बनविण्यात आली आहेत.

मंदिराच्या समोर तत्कालीन खासदार सुरेश टावरे यांच्या खासदार निधीतून प्रशस्त सभागृह बनविण्यात आले आहे. या ठिकाणी पाण्याचे कारंजे, एक नवीन सभागृह देखील बनविण्यात आले आहे. शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी पर्यटन विकासमधून 1 कोटी 13 लाख रुपयाचा निधी मंजूर केल्यामुळे या ठिकाणी विविध विकास कामे करण्यात आली आल्याने श्रावणी सोमवारी शिवभक्त भाविकांची अलोट गर्दी या ठिकाणी पाहावयास मिळते. यामुळे या शिवमंदिरामध्ये येणाऱ्या शिवभक्तांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.

# विहंग चॅरिटेबल ट्रस्टचा मंगळागौर स्पर्धा 2025 उत्साहात संपन्न

■ ठाणे

दिनांक ४ ऑगस्ट २०२५ श्रावणातील मंगलमय वातावरणात विहंग चॅरिटेबल ट्रस्ट व मा. नगरसेविका परिषा प्रताप सरनाईक यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली मंगळागौर स्पर्धा-२०२५, शनिवार दिनांक २ ऑगस्ट रोजी ठाण्याच्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात अत्यंत उत्साही आणि पारंपरिक वातावरणात पार पडली. या भव्य स्पर्धेत ठाण्यासह ओवळा-माजिवडा विधानसभा क्षेत्रातील २० महिला सांघिक गटांनी "रणरागिणी" या प्रेरणादायी संकल्पनेवर मंगळागौर सादर केली. यावेळी पारंपरिक व आधुनिक (फ्युजन) या दोन प्रकारांत मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

एका छोट्या प्रमाणात सुरु



झालेली ही मंगळागौर स्पर्धा आज एका भव्य स्तरावर पोहोचली आहे. महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने आयोजिल्या जाणाऱ्या या मंगळागौर स्पर्धा उपक्रमाने दरवर्षी नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. यंदा पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त "रणरागिणी" ही संकल्पना मंगळागौर स्पर्धेसाठी देण्यात आली होती. या संकल्पनेच्या अनुषंगाने प्रत्येक गटाने सादरीकरणातून जिजाऊ, अहिल्यादेवी, झाशीची राणी, ताराराणी यांच्यासारख्या विविध रणरागिणींचे प्रभावी चित्रण आपल्या कलेतून सादर करून मानवंदना दिली.

# कोरोनाकाळात अनाथ झालेल्या युवकाला 10 लाख!

### पीएम केअर फॉर योजनेतून मदत प्राप्त करणारा पहिला लाभार्थी ठाण्यातील

**प्रतिनिधी**
■ ठाणे

कोरोना काळात अनेक लहान मुलांनी आपले पालक गमावले. या अनाथ मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी २०२१ साली केंद्र शासनाकडून पीएम केअर फॉर चिल्ड्रन योजना घोषित करण्यात आली होती. या योजनेच्या निकषानुसार ठाण्यातील एका अमनजीत सिंग (२३) वर्षीय मुलाला त्याच्या शिक्षणासाठी १० लाखांचा निधी देण्यात आला आहे. ठाणे जिल्हाधिकारी डॉ.कृष्णनाथ पांचाळ यांच्या हस्ते या धनादेश त्याला सुपूर्द करण्यात आला. तर विशेष म्हणजे या योजनेची घोषणा झाल्यानंतर लाभ घेणारा अमनजीत हा महाराष्ट्रातील पहिला लाभार्थी तर भारतातील पहिला मुलगा लाभार्थी



ठरला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

करोना काळामध्ये देशात मोठ्या संख्येने नागरिकांना करोनाची लागण झाली. या काळात मोठ्या संख्येने रुग्णांचा करोनामुळे मृत्यू देखील ओढवला. यामुळे देशात अनेक मुलं अनाथ झाली होती. ज्या मुलांचे दोन्ही पालक करोनामुळे मृत्यूमुखी पडले होते, अशा मुलांच्या पालन – पोषणाची आणि त्यांच्या भवितव्याची मोठी समस्या निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला होता. अशा संकटग्रस्त बालकांच्या आधारासाठी भारत सरकारने २९ मे २०२१ रोजी पीएम केअर फॉर चिल्ड्रन ही विशेष योजना सुरू केली. या योजनेतर्फे १८ वर्षाखालील अनाथ बालकांना शिक्षण, आरोग्य आणि भविष्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याची तरतूद करण्यात आली.

# मनपा पेंशनर्स असोसिएशनच्यावतीने डोंबिवलीत 'रंगाचे मन' कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी**
■ डोंबिवली

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या डोंबिवली शाखेतर्फे, २ ऑगस्ट २०२५ रोजी, क्रीडा भवन, पेंडसे नगर, डोंबिवली पूर्व येथे, डॉ.अमृता जोगळेकर आठवले यांचा ' रंगांचे मन ' हा अनोखा आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मनुष्याच्या आयुष्यावर होणारा रंगांचा प्रभाव वादातीत आहे. रंग आणि माणसाचे मन यांच्या परस्पर संबंधातून घडणाऱ्या क्रिया, प्रतिक्रिया आणि वैचारिक उलथापालथ याचे खोलवर विश्लेषण करून डॉ. अमृता जोगळेकर यांनी एक आगळीवेगळी अनुभूती जागृत केली. एक वैज्ञानिक झालर असलेला थोडासा क्लिष्ट विषय त्यांनी अतिशय सोप्या भाषेत हसतखेळत मांडला. रंगांची नेमकीच नावे माहीत असलेल्या जनसामान्यांना त्यांचे रंगांबद्दलचे सखोल ज्ञान प्रकर्षाने जाणवते. कार्यक्रमास संघटनेचे डोंबिवली निवासी सदस्य, संस्था कार्यवाह डॉ.नलावडे तसेच बदलापूर , ठाणे येथून मुद्दामून आलेले विजय पोतदार, सुहास खामकर, मधुकर आंबोणकर, अलका जोशी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप करताना कमलाकर क्षीरसागर यांनी असे सांगितले की या नाविन्यपूर्ण व्याख्यानाचा गोषवारा, आपल्या कुटुंबियांना तसेच मित्र मंडळी, परिचयातील तरुण वर्ग यांच्यापर्यंत नेण्याचे काम सर्व उपस्थित मंडळींनी करावे. यामुळे समाजात अशा नाविन्यपूर्ण कार्यक्रमा बाबत उत्सुकता निर्माण होईल.

# केडीएमसी पालिका हद्दीत 30 नवीन मालमत्ता कर, पाणी देयक भरणा केंद्रे

**प्रतिनिधी**
■ कल्याण

मागील आठवड्यात मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी दहा प्रभाग हद्दीत १८ मालमत्ता कर आणि पाणी देयक विशेष भरणा केंद्रे सुरू केली आहेत. आपल्या घर परिसरात सुरू झालेल्या या केंद्रांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे मालमत्ता विभागाने दहा प्रभाग हद्दीत वाढीव विविध भागात एकूण ३० नवीन विशेष कर भरणा केंद्रे सुरू केली आहेत. त्यामुळे भरणा केंद्रांची एकूण संख्या ४८ झाली आहे.

नागरिकांनी मालमत्ता कर आणि पाणी देयक शुल्क लवकरात लवकर भरणा करावे आणि मार्च अखेरपूर्वीच पालिकेचा मालमत्ता कर आणि पाणी देयक वसुलीचा लक्ष्यांक पूर्ण व्हावा या दृष्टीने प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. यापूर्वी मालमत्ता विभागात अतिशय संथगतीने आणि नकारात्मक पध्दतीने काम सुरू होते. नागरिक, कर विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये याविषयी नाराजी होती.

# 'इकोफ्रेंडली रक्षाबंधन' उपक्रम महापालिकेत उत्साहात साजरा

**प्रतिनिधी**
■ नवी मुंबई

दिनांक 9 ऑगस्ट 2025 रोजी देशभरात उत्साहात साज-या होणा-या रक्षाबंधन सणाला पर्यावरणशील स्पर्श देणारा 'इको-फ्रेंडली रक्षाबंधन' हा अभिनव उपक्रम महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात उत्साहात संपन्न झाला. यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पामध्ये बनविण्यात आलेल्या कापडाच्या आकर्षक राख्यांचे वितरण महानगरपालिकेतील महिला – अधिकारी, कर्मचारी यांना करण्यात आले.

केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयांतर्गत वस्त्र समितीच्या वतीने



नवी मुंबई महानगरपालिकेसमवेत 'वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा प्रकल्प (Textile Recycling Facility )' देशात पहिल्यांदाच सीबीडी बेलापूर येथे राबविण्यात येत आहे. याठिकाणी नागरिकांनी वापरलेले सुस्थितीतले टाकाऊ कपडे ठिकठिकाणाहून संकलित करुन त्यावर पुनर्प्रक्रिया केली जाते व त्यापासून शोभिवंत उपयोगी वस्तू व कापड तयार करुन पुनर्वापरासाठी उपयोगात आणले जाते.

या अनुषंगाने रक्षाबंधनाचा सण लक्षात घेऊन प्रकल्पस्थळी विविधरंगी आकर्षक कापडी राख्या बनविण्यात आल्या असून त्याचा प्रचार सर्वत्र होण्यासाठी महापालिका मुख्यालय व आठही विभाग कार्यालये याठिकाणी स्टॉल लावण्यात आले आहेत. या स्टॉल्सची व त्या अनुषंगाने वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पाची माहिती जनतेमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात प्रसारित होण्याकरीता 'इकोफ्रेंडली रक्षाबंधन' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला असल्याचे याप्रसंगी बोलताना घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त स्मिता काळे यांनी सांगितले. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व स्मिता काळे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा.आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, कार्यकारी अभियंता आदी मान्यवरांच्या हस्ते कापडी राख्यांचे मोठया संख्येने उपस्थित महिला अधिकारी, कर्मचारी यांना वाटप करण्यात आले.

# निवृत्तीपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजूर झालेल्या फाईलींची चौकशी व्हावी

**प्रतिनिधी**
■ ठाणे

ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे ३१ जुलैला निवृत्त झाले. परंतु आता मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी एक गंभीर आरोप केला आहे. त्यांनी निवृत्ती पूर्वी अनेक फाईलींवर सह्या करुन त्या मंजूर केल्या. राजकीय दबावापोटी हा प्रकार झाला असून या सर्व फाईलींबाबत चौकशी केली जावी अशी मागणी जाधव यांनी केली. मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या घरी जाऊन ३१ जुलैला त्यांच्या दोन फाईल मंजूर करून घेतल्या अशी माहिती आमच्याकडे असेही अविनाश जाधव म्हणाले.

राज्यातील सत्ताबदलानंतर विविध जिल्ह्यातील प्रशासकीय



आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरु झाले. यामध्ये ठाणे जिल्हाधिकारी पदी असलेल्या राजेश नार्वेकर यांच्या जागी ठाणे जिल्हाधिकारी म्हणून अशोक शिनगारे यांची वर्णी लागली होती. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून शिनगारे यांची ठाणे जिल्हाधिकारी पदी म्हणून वर्णी लागल्याचे बोलले जात होते. तर, राजेश नार्वेकर हे ठाकरे गटाचे संजय राऊत यांचे व्याही असल्याने यांची बदली झाली असल्याच्या ही चर्चा त्यावेळी रंगल्या होत्या. यामुळे ठाणे जिल्हाधिकारी पद चांगलेच चर्चेत आले होते. ३१ जुलैला अशोक शिनगारे हे देखील ठाणे जिल्हाधिकारी पदावरून निवृत्त झाले. निवृत्त होण्यापूर्वी त्यांनी अनेक फाईलींवर स्वाक्षऱ्या केल्याचा आरोप मनसेने केला आहे.

मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्यांनी आरोप केले. अविनाश जाधव म्हणाले की, निवृत्तीपूर्वी जिल्हाधिकारी हे दोन दिवस फक्त सह्या करत होते. ते कोणाच्या दबावाखाली सह्या करत होते. इतके वर्ष ते ठाण्यात होते, त्यावेळी त्यांनी या सह्या का नाही केल्या असे अनेक प्रश्न आमच्या समोर आहेत असे जाधव म्हणाले. मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा गैरवापर केला असेल तर त्यांना शिक्षा मिळाली पाहिजे असेही जाधव म्हणाले.

मध्य रेल्वे

ओएचई स्ट्रक्चरचे काम

खुली ई-निविदा सूचना क्र.: बीबी. एलडी.५८३.पी.रिव्ह.२३/०९.कॉन्ट आर १ दि. ०१.०८.२०२५ कामाचे नाव : मुंबई विभागामधील कुर्ला आणि जुईनगर जिल्ह्यामधील ओएचई स्ट्रक्चरवर इंस्युलेटिंग नॉन टॉक्सिक बर्ड जेलची तरतूद. अंदाजे मूल्य: रु. ३,३४,८०,८१७.७६. बोली सुरक्षा: रु. ३,१७,४००/-. निविदा अर्जाचे शुल्क : रु. ०/-. पूर्तता कालावधी: २४ महिने. प्रस्तावांची वैधता : ६० दिवस. I) वरील निविदेच्या निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ: १७/०७/२०२५ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. II) प्रस्तावित निविदाकारांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकच्या अधिका तपशिलासाठी www.ireps.gov.in ला भेट द्यावी. III) उपरोक्त ई-निविदेमध्ये निविदाकार केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाच्या द्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेसाठी प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते उघडण्यात किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. IV) बोली सुरक्षा निविदा कागदपत्रामध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार सादर करावे. V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई विभाग, मध्य रेल्वे, अनेक्स बिल्डींग, २ रा मजला, सीएसएमटी, मुंबई दूर: ०२२ २२६१२३५५ वर संपर्क करा. निविदेचा पूर्ण तपशील www.ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (कर्षण वितरण) मुंबई सीएसएमटी ४००००१ ह्यांच्या सूचना फलकावर देखील उपलब्ध आहे. एके ३३१

रेल्वे लाईन अनधिकृतपणे ओलांडणे दंडनीय अपराध आहे

## गणरायाला निरोप देण्यासाठी ढोलताशा पथकांच्या संख्येवर निर्बंध

**पुणे :** अवघ्या जगाचे लक्ष यंदाच्या गणेशोत्सवावर लागले आहेत. काही दिवसांतच गणरायाचे धुमधडाक्यात आगमन होणार आहे. त्याचबरोबर गणरायाला निरोप देताना कोणती काळजी घ्यावी यासाठी अनेक मंडळ बऱ्याच दिवसांपासून पूर्वनियोजन करत आहेत. अशातच आता पुण्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन मिरवणुकीच्या आयोजनाबाबत वादग्रस्त परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हं दिसत आहेत. बाळासाहेब ठाकरे कलादालनात पार पडलेल्या एका बैठकीत पुण्यातील सत्तरहून अधिक गणेश मंडळांचे पदाधिकारी एकत्र आले आणि विसर्जन मिरवणुकीसंबंधी काही महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. या बैठकीत यंदा विसर्जन मिरवणुकीच्या वेळापत्रकात मोठा बदल होणार असून ढोल ताशा पथकावर देखील निर्बंध लादण्यात आले आहेत. या बैठकीत अनेक मंडळांनी विसर्जन मिरवणुकीच्या वेळेसंदर्भात नाराजी व्यक्त केली. लक्ष्मी रस्त्यावरील पारंपरिक मिरवणुकीत दरवर्षी सुमारे तीनशेहून अधिक गणेश मंडळे सहभागी होतात. मात्र, पाच मानाच्या गणपतींच्या मिरवणुकीनंतरच उर्वरित मंडळांना विसर्जनासाठी संधी मिळते.



## म ह त्वा चे

### आंतरजातीय विवाह केल्याने तरुणाला मारहाण

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून एका 39 वर्षीय तरुणाला गावातच दिवसाढवळ्या घरात घुसून बेदम मारहाण करण्यात आली, आणि त्यानंतर त्याच्या पत्नीचे लोकांनी अपहरण केले. तरुणीच्या आई आणि भावानेच हे धक्कादायक कृत्य केले आहे. या घटनेचा थरारक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत असून, संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पीडित तरुणाचे नाव विश्वनाथ बबन गोसावी असून तो सध्या गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही मारहाण आणि अपहरण आंतरजातीय प्रेमविवाहामुळे घडली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विश्वनाथ गोसावी याचे प्राजक्ता (वय २८) या तरुणीसोबत प्रेमसंबंध होते.

### मेडिकलच्या विद्यार्थ्याने घेतला गळफास

**नागपूर** : नागपुरातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. एमबीबीएस अंतिम वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यानं आत्महत्या केली आहे. घरातील बाथरूमच्या दरवाज्याला शाल बांधून गळफास लावून त्यानं आयुष्य संपवलं. दरवाजा तोडल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. सोनगाव पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. सध्या पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. संकेत दाभाडे असे विद्यार्थ्याचे नाव आहे. तो एम्स हॉस्पिटलमध्ये शेवटच्या वर्गात शिकत होता. घटनेच्या दिवशी तो आपल्या खोलीत गेला. त्यानंतर शाल घेऊन बाथरूममध्ये गेला. बाथरूमच्या दरवाज्याला शाल बांधून त्यानं गळफास घेत आत्महत्या केली. मागील २ दिवसांपासून त्याच्या खोलीचा दरवाजा बंद होता. संकेत काही घराबाहेर आलाच नाही, असं शेजाऱ्यांनी सांगितलं. खोलीमध्ये कोणतीही हालचाल नव्हती. कोणताही आवाज येत नव्हता. संकेत दिसला नाही म्हणून इतर विद्यार्थ्यांना संशय आला.

### पोषण आहाराची आधी मुख्याध्यापक आणि शिक्षक चव घेणार

**पुणे** : राज्यातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे परिणाम रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवे नियम लागू केले आहेत. यापुढे विद्यार्थ्यांना अन्न देण्याआधी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी त्या आहाराची चव घेणे आणि दर्जा तपासणे अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबतची मानक कार्यपद्धती (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या गुणवत्तेसाठी आता अधिक दक्षता घेतली जाणार आहे. भोजन तयार झाल्यानंतर अर्धा तास आधी शिक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाकी यांनी चव घेणे अनिवार्य, चव आणि दर्जाविषयी अभिप्राय नोंदवहीत नोंदवणे बंधनकारक, जेवणाचे नमुने हवाबंद डब्यात २४ तास ठेवणे आवश्यक, अन्नधान्य आणि साहित्य एक वर्ष मुदतीचे असणे आवश्यक आणि स्वच्छ हात आणि साबण-पाण्याची उपलब्धता बंधनकारक करण्यात आले.

# नागपूरमध्ये मद्यधुंद सैन्य अधिकाऱ्याच्या गाडीने 30 लोकांना चिरडले

## जमावाने दिला चोप

प्रतिनिधी
■ नागपूर

नागपूरमध्ये दारूच्या नशेत गाडी चालवून एका 30 लोकांना चिरडलं आहे. या अपघातात 25 ते 30 जण जखमी झाले आहेत. या अपघातानंतर उपस्थित जमावाने चालकाला ताब्यात घेऊन त्याला चोप दिला आणि पोलिसांच्या हवाले केले.

आरोपी अधिकारी हरषपाल महादेव वाघमारे (40) हे भारतीय लष्करात कार्यरत असून सध्या आसाममध्ये तैनात आहेत. ते चार दिवसांच्या रजेवर होते आणि महाराष्ट्रात भेटीदरम्यान ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वाघमारे हमलपूरीच्या दिशेने जात होते.



तेव्हा त्यांच्या गाडीवरून ताबा सुटला. उपस्थितांनी सांगितले की, वाघमारे यांनी रस्त्यावर चालणाऱ्यांना बेदरकारपणे उडवले आणि नाल्यात त्याची गाडी कोसळली. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी वाघमारे यांना गाडीतून बाहेर काढले आणि चोप दिला. या मारहाणीत वाघमारे जखमी झाले. पोलिसांनी वाघमारेंना रुग्णलयात दाखल केले असून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पुण्यात निर्माणाधीन बांधकामाच्या ढिगाऱ्याखाली 3 कामगार अडकले

## अग्निशमन दल घटनास्थळी

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यात निर्माणाधीन बांधकामाच्या ढिगाऱ्याखाली ३ कामगार अडकल्याची घटना घडली आहे. पुण्यातील सिंहगड रोड, नांदेड सिटीमध्ये बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी ढिगाऱ्याखाळी ३ कामगार अडकले आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आहेत. या घटनेने इतर कामगारांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील नांदेड सिटीमध्ये एका ठिकाणी काम सुरु असताना ३ कामगार मातीच्या ढिगाऱ्याखाली



अडकल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पुणे आणि पीएमआरडीएचे अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले. तसेच पीडीआरएफचे जवान देखील घटनास्थळी पोहोचले.

पुणे महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाइनचं काम सुरु असताना ही दुर्दैवी घटना घडली. या कामगारांचे तोंड वर आहे. तर त्यांचं शरीर मातीत अडकलं आहे. या कामगारांना अग्निशमन स्थानिक प्रशासनाच्या मदतीने बाहेर काढण्याचे काम सुरू आहेत. या घटनेत आतापर्यंत एका कामगाराला रेस्क्यू करून बाहेर काढलं आहे. तर दोघांना बाहेर काढण्याचं काम सुरु आहे.

# खासगी क्लासच्या आवारात दहावीतील विद्यार्थ्याचा खून

## बेंचवर बसण्यावरून वाद

प्रतिनिधी
■ नाशिक

शहरातील सातपूर भागात असलेल्या एका खासगी कोचिंग क्लासेसच्या बाहेर दहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या वादातून एका विद्यार्थ्याचा खून झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली. सीसीटीव्ही फुटेजवरून सातपूर पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतलं असून त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, नाशिकच्या सातपूर भागातील अशोकनगर येथील पवार संकुलात राहणारा यशराज गांगुर्डे हा खासगी क्लासला जात होता. शनिवारी रात्री रस्त्यात तो बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. यावेळी क्लास चालक मस्के यांनी त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केलं. डॉक्टरांनी तिथून तत्काळ पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवलं.

# तिसऱ्या भाषेच्या समितीविषयी सरकारची भूमिका संशयास्पद

## शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समितीचे पवार यांचा आरोप

■ संभाजीनगर

राज्यात पहिली ते पाचवी इयत्तांमध्ये तिसऱ्या भाषेच्या अंमलबजावणीसंदर्भात अभ्यासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केल्याची घोषणा केली होती. मात्र आज या निर्णयाला एक महिना पूर्ण होऊनही समितीत कोणत्याही सदस्याची नियुक्ती झालेली नाही. तसेच समितीची कार्यपद्धती ठरवलेली नाही. त्यामुळे समिती केवळ एक सदस्यीयच राहणार का? असा सवाल उपस्थित करत, शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समितीचे निमंत्रक डॉ. दीपक पवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी कृती समन्त्रय समितीचे कार्यबाह आनंद भंडारे यांची उपस्थिती होती.

शहरातील पत्रकार भवनात रविवारी (दि.३) आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पवार म्हणाले, समितीला तीन महिन्यांचा कालावधी दिला आहे. आता केवळ ४५ ते ५० दिवस उरले आहेत. अशा स्थितीत सदस्य आल्यावर समिती वेळेत आपले काम पूर्ण करू शकेल का? की समितीला मुदतवाढ दिली जाणार आहे? हे देखील सरकारने स्पष्ट करावे. तसेच महाराष्ट्रात पूर्वी जिथे एक सदस्य समित्या नेमल्या गेल्या, तिथे निर्णय राज्याच्या हिताच्या बिरोचात गेले आहेत. अद्याप समितीची कार्यपद्धती ठरवलेली नाही, तरीही डॉ. जाधव सार्वजनिक कार्यक्रमांमधून आपली वैयक्तिक मते मांडत आहेत, हे चुकीचे आहे.

तसेच योग्य काम करत नसल्याने शिक्षणमंत्री दादा भुसे आणि एमएससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार राजीनामे घ्यावे, असेही पवार म्हणाले.

### समितीचा अहवाल मनपा निवडणुकीनंतरच

*पवार म्हणाले, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समितीचा अहवाल अवलंबून आहे. आणि आम्हाला संशय आहे, समितीचा अहवाल निवडणुकीनंतर प्रसिद्ध करणार आहे. जर हा अहवाल महापालिकेच्या निवडणुकीच्या आधी येणार नसेल, तर डॉ. जाधव आणि सरकार दोघंही जन-तेनी फसवणूक करत आहेत का? याचे उत्तर त्यांनी द्यावे.*

### मुलांना मराठी शाळेत घाला : चिन्मयी सुमित

*वडील अधिकारी आणि आई प्राध्यापक असूनही मी जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिकले, पण कमीही करिअरमध्ये अडवण आली नाही. मराठी शाज्य म्हणजे कमीपणा नाही, तो अभिमान आहे. त्यामुळे मराठी प्रेमींनी आपल्या मुलांना मराठी शाळेत पालाचे, असे आवाहन अभिनेत्री व मराठी शाळांची सदिच्छा दूत चिन्मयी सुमित यांनी केले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त रविवारी विद्रोही सांस्कृतिक चळवळीकडून आयोजित मराठी भाषा आणि संस्कृती संवर्धन परिषदेत त्या बोलत होत्या.*

### ..तर ठाकरे बंधूंना मराठीसाठी आग्रहाने लढायला उभे करू

*पवार मागाले, मराठीच्या प्रश्नावरून दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याची चर्चा आहे. कदाचित ते स्वतंत्रपणेही एकत्र आले असते, पण भाषेच्या लब्धामुळे त्यांच्या एकत्र येण्याचा वेग नक्कीच वाढला. जर ते खरेच मराठीसाठी एकत्र आले असतील, तर त्यांना मराठीच्या संवर्धनासाठी आणि तिसऱ्या भाषेचा सक्ती होऊ नये म्हणून आग्रहाने लढायला उभे करण्याची मागणी आपण आम्ही करू शकती.*

# चिपळूण येथे नागरिकांनी महामार्ग रोखला

## उड्डाणपुलाचे काम करताना लोखंडी सळी विद्यार्थ्याच्या अंगावर पडल्याने जखमी

प्रतिनिधी
■ चिपळूण

मुंबई-गोवा महामार्गावर शहरात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. डीबीजे महाविद्यालयासमोर एका पिलरवरून लोखंडी सळी टाकण्याचे काम सुरू असताना त्यातील एक सळी रस्त्यावरून जाणाऱ्या विद्यार्थ्याच्या हातावर पडली. यात विद्यार्थी बालंबाल बचावला असून त्याच्या हाताला किरकोळ दुखापत झाली. यावेळी संतप्त शिंदे युवासेना आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी



ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको केला. सुमारे अर्ध्या तासाहून अधिक काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

गेल्या काही वर्षापासून शहरातील बहादूरशेखनाका ते पाग बौद्धवाडी दरम्यानच्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या पुलाचे काम सुरवातीपासूनच या ना त्या कारणाने वादग्रस्त बनले आहे. दोन वर्षापुर्वी बहादूरशेखनाका येथे उड्डाणपुलाचे गर्डर कोसळल्याची गंभीर घटना घडली होती. त्यानंतर काही महिन्यातच पिलरवरून दोन कर्मचारी पडून गंभीर जखमी झाले होते. त्यापाठोपाठ सुरक्षितेसाठी पुलाच्या ठिकाणी लावलेली जाळी एका धावत्या ट्रकला अडकली होती. त्यामुळे देखील मोठा धोका निर्माण झाला होता. याशिवाय सातत्याने या परिसरात किरकोळ व मोठे अपघात होत आहेत.

# कसाल येथे भरधाव कारच्या धडकेत एका महिलेचा जागीच मृत्यू

## पती आणि दोन मुले थोडक्यात बचावले

■ सावंतवाडी

मुंबई-गोवा महामार्गावर कसाल येथील खालसा धाब्यासमोर भरधाव वेगाने जाणाऱ्या एर्टिगा कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील महिलेचा जागीच मृत्यू झाला. मात्र, तिचे अपंग पती, चार महिन्यांची मुलगी आणि साडेतीन वर्षांचा मुलगा सुदैवाने बचावले. ही घटना आज सोमवारी दुपारी घडली.

शमिका शशांक पवार (वय २७) असे मृत महिलेचे नाव आहे.




त्यांचे पती शशांक प्रकाश पवार (वय ४०), मुलगी पवित्रा आणि मुलगा प्रभास हे या अपघातातून बचावले आहेत. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एर्टिगा कार चालकाचे नाव राहुल शर्मा असे असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

या अपघाताची अधिक माहिती अशी की, पवार कुटुंबीय आपल्या सुझुकी मोपेडवरून कणकवलीच्या दिशेने जात होते. त्याचवेळी त्यांनी महामार्गावर अचानक लेन बदलण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या एर्टिगा कारने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मोपेडच्या मागे बसलेल्या शमिका पवार रस्त्यावर आपटल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# पाचगणी पठारावरील नैसर्गिक ठेवा जपण्याची गरज – संतोष पाटील

प्रतिनिधी
■ सातारा

युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत सह्याद्री पर्वतरांगेची नोंद केली आहे. त्यातील पाचगणी हे गाव १० दुर्मीळ वनस्पती आणि प्राण्यांचा मूळ अधिवास आहे. जे इतर कोठेही आढळत नाहीत. परंतु अलीकडच्या काळात निसर्गाचा हा ठेवा लोप पावू लागला आहे. हा वारसा, हा ठेवा आपण सर्वांनी जतन केला पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले.



पाचगणी गिरिस्थान पालिका आणि पुणे येथील रानवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पाचगणी येथील टेबल लॅण्ड पठारावरील ऱ्हास पावणाऱ्या दुर्मीळ वनस्पतीच्या पुनर्रोपण कार्यक्रम प्रसंगी पाटील बोलत होते.

# ज्ञानेश्वरी मुंडेंनी आणले कराड सोबतच्या ओळखीचे पुरावे

प्रतिनिधी
■ बीड

महादेव मुंडे हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप बाळा बांगर यांनी केला होता. तसेच वाल्मिक कराडची मुलंही या हत्येत सहभागी होते असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला होता. मात्र वाल्मिक कराडचा मुलगा सुशील कराडने हे सर्व आरोप फेटाळले होते. आम्ही महादेव मुंडेंना ओळखत नव्हतो असं सुशील कराडने म्हटलं होतं. त्यानंतर आता महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडेंनी दिलेल्या उत्तरामुळे या प्रकरणाला नवीन वळण मिळाले आहे.

सुशील कराड यांनी म्हटले



होते की, 'महादेव मुंडे हत्या प्रकरणात होत असलेले आरोप खोटे आहेत. महादेव मुंडेंना आम्ही कधीही ओळखत नव्हतो. ना मी त्यांना कधी पाहिलं होतं, ना माझ्या भावाने त्यांना कधी पाहिलं होतं, ना माझ्या वडिलांनी त्यांना कधी पाहिलं होतं.'

यावर बोलताना ज्ञानेश्वरी मुंडेंनी म्हटले की, 'तुम्ही जर महादेव मुंडे ला ओळखत नव्हता तर पोलिसांना का कॉल केले. मी पहिल्यापासून सानप यांच्या सीडीआरची मागणी करत आहे. तसच भास्कर केंद्रे या यांचेही सीडीआर काढण्यात यावे ही माझी मागणी आहे. ठाकूर यांच्यासहित डीवायएसपी कविता नेहरकर यांचाही सीडीआर काढण्यात यावा.

# रत्नागिरीच्या राजाचे रत्ननगरीत आगमन

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यात गणेश आगमनाची चाहूल लागली आहे. जिल्ह्यात गणेश उत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेला रत्नागिरीचा राजाचे रत्न नगरीत मोठ्या भक्तीभावाने व ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढून रत्नागिरीकरांनी स्वागत केले. रविवारी सायंकाळी उशिरा पर्यंत काढण्यात आलेल्या या मिरवणूकीमध्ये तरुणाईने डीजेच्या तालावर ठेका धरला.

रत्नागिरीचा राजाचे स्वागत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रत्नागिरीकरांनी गर्दी केली होती. या राजाच्या मिरवणूकीला साळवी स्टॉप येथून सुरुवात करण्यात आली. ढोल ताशांच्या पथकासह डीजेच्या तालावर अवघी तरुणाई थिरकली. मिरवणूकी दरम्यान शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची कर्नाटकात एंट्री

## अनेक मठाधिपतींचा पक्षात प्रवेश

प्रतिनिधी
■ बेळगाव

सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी इनकमिंग आऊटगोईंग सुरु आहे. महापालिका आणि स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते हे पक्ष बदल करताना दिसत आहेत. त्यातच आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बेळगावातील १२ मठाधिपतींनी आज शिवसेनेत प्रवेश केला आहे. दत्त गगनगिरी ध्यानमंदिराचे मठाधिपती प.पु. पुरुषोत्तम माळी महाराज यांच्या



नेतृत्वाखाली चिकोडी येथील अनेक महाराजांनी शिवसेनेचा भगवा झेंडा हाती घेतला. या पक्षप्रवेशामुळे कर्नाटकातील बेळगावमध्ये शिवसेना पक्षाला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाण्यातील आनंद आश्रम या ठिकाणी एक पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या कार्यक्रमात पुरुषोत्तम माळी महाराज यांच्यासह सागर बागडी, नूतन धनावडे, बाळकृष्ण कांबळे, सुवेल शेट्टे, मयूर गुरव, साई पाटील, अनिकेत वरके, सुषमा खरात, दीपा फडणवीस, अरविंद शिरळाकर, दादा महाराज आणि अजय घराडे या महाराजांनी शिवसेनेत प्रवेश केला. मागील तीन वर्षांपासून लोकांचा शिवसेनेकडे ओढा वाढत आहे. हिंदुत्व आणि विकासाचा विचार घेऊन आम्ही पुढे चाललोय, असे ते म्हणाले. महाराष्ट्र हा साधुसंतांचा आहे.

### जाहीर नोटीस

अर्जदार / वादी

उपनिबंधक, जन्म, मृत्यू निबंधक
ए./बी. विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका — सामनेवाला / प्रतिवादी

ज्या अर्थी जन्ममृत्यू नोंदणी अभियान 1969 व भारताचे राज्यपत्र जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 मधील कलम 11 (3 ) अन्वये जन्माची मृत्यूची नोंद घेऊन जन्म नोंद /मृत्यू प्रमाणपत्र निगमित करण्यासाठी संबंधित प्राधिकरणास आदेश होणे बाबत मोहम्मद फजल शेख यांनी या न्यायालयात अर्ज केला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कडे शासन निर्णय क्रमांक जमुना 2525/ई. आ. 991181/प्र. क्र.22/कु. क./दि. 12/03/2025 अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्याअर्थी सर्व नागरिकांस कळविण्यात येते की अर्जदार / वादी यांनी मुमताजबी मोहम्मद फजल शेख यांचा मृत्यु दिनांक 09.02.2019 रोजी पत्ता रूम नंबर 9 आसम जेठाचा चाल, जकेरिया बंदर, शिवडी या ठिकाणी झालेला आहे असा दावा केलेला आहे. परंतु सदरची जन्म नोंद मृत्यूनंतर संबंधित वॉर्ड मधील जन्म मृत्यू निबंध तथा वैद्यकीय आरोग्य आलेखात यांच्या कार्याद्यात करण्यात आलेली नाही सदरची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या जन्म नोंदणी अभिलेखात घेऊन जन्म मृत्यू निबंधक तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी जन्माचे प्रमाणपत्र निगमित करणे बाबत कोणाचेही संबंध असल्यास आक्षेप असल्यास किंवा काही माहिती पुरवायची असल्यास त्यांनी या जाहीर नोटिसीच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर संजय गांधी योजना शाखा पुरी क्रमांक 234 जुने जकात घर दुसरा मजला शहीद भगतसिंग मार्ग फोर्ट मुंबई : 400001 येथे हजर राहून आपली लेखी स्वरूपात आक्षेप / म्हणणे सादर करावे.

आणखी असेही कळविण्यात येते की जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणी आक्षेप / म्हणणे साधन न केल्यास सदरहू न्यायालयाद्वारे उचित कार्यवाही करून उपरोक्त अर्जदार यांच्या दावेनुसार नोंदणी करणेबाबत संबंधित जन्म मृत्यू निबंधक यांना आदेश निगरमित करण्यात येईल अथवा निर्णय देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

### जाहीर सूचना

माझ्या अशिलांच्या वतीने जाहीर सूचना देण्यात येत आहे की श्रीमती सुहासिनी दत्ताराम राणे या खोली क्रमांक २०६, दुसरा मजला, ए-विंग, रॉयल -ए कॉ.-ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, इमारत क्रमांक ए-५, नाना नानी पार्क, गीतांजली शाळेजवळ, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), जिल्हा पालघर -४०१३०५, ३३० चौ. फूट (बिल्ट-अप एरिया), सर्व्हे क्रमांक १२५, हिस्सा क्रमांक ४ आणि ७, शेअर सर्टिफिकेट क्रमांक ०२२, शेअर ५ क्रमांक १०६ ते ११० पर्यंत जागेच्या मालक आहेत. माझ्या अशिलाने २७ एप्रिल २०१२ रोजी श्री. सुभाष रामभाऊ चव्हाण यांच्यामार्फत मे. रॉयल कन्स्ट्रक्शनकडून 'विक्रीसाठी करार' द्वारे वरील उल्लेखित सदनिका खरेदी केला होती. माझ्या अशिलाने असे जाहीर केले आहे की सदर 'विक्रीसाठी करार' हा वरील उल्लेखित पक्षांमधील नोटरीकृत करार आहे आणि या 'करार' मध्ये सदनिका क्र. ए/२०६ ऐवजी परिशिष्ट 'बी' मध्ये नमूद केलेल्या २०७ असा उल्लेख असून, आता माझे अशिल वरील नमूद सदनिका संबंधित खरेदीदारांना विकू इच्छित आहेत आणि संबंधित खरेदीदारांनी संबंधित वित्त कंपनीकडून गृहकर्ज घेतले आहे. जर कोणत्याही व्यक्तींना वरील नमूद केलेल्या विक्री कराराबद्दल किंवा कर्ज प्रक्रियेबद्दल काही आक्षेप असल्यास सदर सूचना प्रसिद्धीपासून ७ दिवसांच्या आत आक्षेप अरुण कुमार जैन, वकील यांच्या दुकान क्रमांक १, मिठबाव वाडी, विरार पूर्व पार्किंग जवळ, एसबीआय बँक गार्डन समोर, विरार (पूर्व), जिल्हा पालघर-४०१३०५ येथील कार्यालयात पाठवावेत.

**दिनांक : ०५/०८/२०२५** — **सही/-**
**अरुण कुमार जैन**
**वकील उच्च न्यायालय**

## डॉ. मारुती नलावडे यांचा सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्काराने गौरव

**मुंबई :** लेखन, अध्यापन, शिक्षण आणि समाजकार्य या विविध क्षेत्रात ठसा उमटवणारे लेखक आणि कवी डॉ. मारुती नलावडे यांना "साप्ताहिक आम्ही मुंबईकर वृत्तपत्रातर्फे" दिला जाणारा "सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्कार 2025" नुकताच मुंबई येथे संपन्न झालेल्या पुरस्कार समारंभात प्रदान करण्यात आला. "अक्षरझेप" या पुरस्कार प्राप्त काव्यसंग्रहाद्वारे साहित्य क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या डॉ. नलावडे यांची आजपर्यंत तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचा "अहो, खरंच ४८० टक्के!" हा रसरशीत जिवंतपणा असलेला, सामाजिक प्रबोधनात्मक दीर्घकथासंग्रह मे 2024 मध्ये प्रकाशित झाला असून यावर्षी नुकताच "अक्षरकुंभ" हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. डॉ. नलावडे हे गेल्या सहा वर्षांपासून "बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन" या अग्रगण्य संस्थेचे कार्यवाह म्हणून धुरा सांभाळत आहेत. पालिकेच्या "महापौर पुरस्कार" तसेच महाराष्ट्र शासनाच्या "आदर्श शिक्षक राज्य पुरस्काराने"ही ते सन्मानित झालेले आहेत.



## मदनपुरा भागात पोस्टाच्या इमारतीचा भाग कोसळला; जीवितहानी नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

भायखळा येथील मदनपुरा इमारतीचा काही भाग रविवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास अचानक कोसळला. सदर म्हाडाची इमारत अतिधोकादायक असल्याचे यापूर्वीच घोषित करण्यात आले होते . काही दिवसांपूर्वीच इमारतीतील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्याने सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही. दरम्यान, रिकामी केलेली म्हाडाची इमारत दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



भायखळा मदनपुरा डाक कार्यालयाच्या तीन मजली इमारतीचे बांधकाम जीर्ण झाल्यामुळे इमारतीला अतिधोकादायक (सी-१ श्रेणी) म्हणून घोषित करण्यात आले होते. रविवारी मध्यरात्री इमारतीच्या पहिल्या आणि तिसऱ्या मजल्यामागील भाग कोसळला. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्य सुरू केले. त्यांनतर संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी, म्हाडाचे कर्मचारी, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी संपूर्ण इमारत खाली केली. मात्र, दुसऱ्या दिवशी सोमवारी साडेअकराच्या सुमारास रिकामी केलेली संपूर्ण इमारत पत्त्याच्या बंगल्यासारखी खाली कोसळली.

## गिलच्या संघाने केले 'दिलखुश'
## इंग्लंडचा माज उतरवला; मालिका बरोबरीत

### ओव्हल कसोटीत टीम इंडियाचा ६ धावांनी रोमहर्षक विजय

वृत्तसंस्था
■ लंडन

भारतविरुद्ध इंग्लंड कोसटी मालिका सुरु आहे. या मालिकेतील शेवटचा आणि पाचवा कसोटी सामना ओव्हलमध्ये रंगला. या निर्णायक कसोटीत भारताचा विजय झाला आणि मालिका बरोबरीत सुटली. भारताने हा सामना सहा धावाने जिंकला. चौथ्या दिवसापर्यंत सामन्यात आघाडीवर असलेला इंग्लंड संघ पाचव्या दिवशी कोसळला. ओव्हल कसोटीच्या शेवटच्या दिवशी टीम इंडियाने इंग्लंड संघाचा ६ धावांनी पराभव केला. यासह, ५ सामन्यांची मालिका २ -२ अशी बरोबरीत संपली.

शेवटच्या दिवशी इंग्लंडला ३५धावांची आवश्यकता होती, तर त्यांच्याकडे ४ विकेट शिल्लक होत्या. मोहम्मद सिराजने भारतासाठी शानदार गोलंदाजी केली आणि टीम इंडियाला



विजय मिळवून देण्यात तो सर्वात मोठा हिरो ठरला. भारताने शेवटच्या डावात इंग्लंडला ३७४ धावांचे लक्ष्य दिले होते. हा भारताचा सर्वात कमी धावांच्या फरकाने विजय आहे. यापूर्वी भारतीय संघाने युवा शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली एजबॅस्टन येथे इंग्लंड संघाचा पराभव केला होता, तर मँचेस्टर कसोटी अनिर्णित राहिली होती.भारतीय संघाने या विजयाने 'बेजबॉल' टाइप खेळाची मर्दुमकी सांगणाऱ्या गोऱ्यांचा माज पार उतरवला आहे. त्यांच्याच घरात शिरून मालिका बरोबरी सोडवत गिलच्या युवा ब्रिगेडने भारतीय क्रिकेत शौकिनाना बेहद खुश केले आहे.

चौथ्या दिवसाच्या खेळाच्या अखेरीस इंग्लंडने ७६.२ षटकांत ६ विकेट्सच्या मोबदल्यात ३३९ धावा केल्या होत्या. पावसामुळे खेळ लवकर संपवावा लागला. शेवटच्या दिवशी भारतीय संघाला विजयासाठी ४ विकेट्सची आवश्यकता होती, तर इंग्लंडला ३५ धावांची आवश्यकता होती. सामना सुरू झाला तेव्हा प्रसिद्ध कृष्णाने टाकलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने सलग दोन चौकार मारले.मात्र आधी ब्रुक्सचा झेल घेताना मोठी चूक करणाऱ्या मोहम्मद सिराजने आपल्या या चुकीचे परिमार्जन करत इंग्लंडच्या ३ फलंदाजांना पाचव्या दिवशी तंबूत पाठवले. त्याच्या या जबरदस्त कामगिरीमुळेच इंग्लंड विजयापासून केवळ ७ धावांनी वंचित राहीला. सिराजने ओव्हल कसोटीत इंग्लंडच्या दुसऱ्या डावात १०४ धावांच्या मोबदल्यात ५ फलंदाज बाद केले. सिराजला उत्तम साथ देत प्रसिद्ध कृष्णाने १२६ धावांच्या मोबदल्यात ४ विकेट घेतल्या.


## इंटर मियामीचा कर्णधार लिओनेल मेस्सी जखमी

### अनिश्चित काळासाठी मैदानाबाहेर

वृत्तसंस्था
■ मियामी

इंटर मियामीचा कर्णधार लिओनेल मेस्सी उजव्या स्नायूच्या दुखापतीमुळे अनिश्चित काळासाठी बाहेर पडला आहे, अशी पुष्टी क्लबने अधिकृत निवेदनात केली आहे. शनिवारी मेक्सिकन संघ नेकाक्सा विरुद्ध लीग कप सामन्यादरम्यान मेस्सीला ही दुखापत झाली. मेस्सीच्या दुखापतीनंतरही, इंटर मियामीने नेकाक्सा विरुद्ध पेनल्टी शूटआउटमध्ये ५-४ असा विजय मिळवला.

मेस्सीला अवघ्या ११ व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. तो स्वतःच्या पायाने लॉकर रूममध्ये गेला असला तरी, दुखापतीची तीव्रता लक्षात



घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.इंटर मियामीच्या निवेदनानुसार, 'मेस्सीच्या उजव्या पायाच्या स्नायूला किरकोळ दुखापत झाल्याची पुष्टी अहवालात करण्यात आली आहे. त्याची वैद्यकीय स्थिती आणि उपचारांना मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे त्याला खेळण्याची परवानगी दिली जाईल.'

## सायन प्रतीक्षानगरचे शिवसेना (ठाकरे) माजी नगरसेवक रामदास कांबळे शिंदे सेनेत

प्रतिनिधी
■ मुंबई

ठाकरे शिवसेना सायन प्रतीक्षा येथे शाखा क्रमांक १७३ चे ठाकरे गटाचे माजी नगरसेवक रामदास कांबळे यांनी काल ठाण्यात एकनाथ शिंदे सेनेत प्रवेश केला. त्यांच्या सोबत एक महिला शाखाप्रमुख, २ महिला उपशाखा प्रमुख, आणि २ उपशाखा प्रमुख यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. कांबळे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे विभागात खळबळ माजली आहे.

कांबळे यांनी रविवारी दुपारी शिंदे सेनेत प्रवेश केल्याचे समजताच शिवसैनिकांनी शाखेत गर्दी केली व फलकावरील कांबळे यांच्या फोटोला काळे फासले. खासदार अनिल देसाई



, व विभागप्रमुख प्रमोद शिंदे यांनी शाखेला भेट दिली. व शिवसैनिकांशी चर्चा केली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनीही खासदार अनिल देसाई यांच्या फोनवरून शाखेतील शिवसैनिकांशी संपर्क साधला.यावेळी उपविभाग प्रमुख प्रभाकर भोगले म्हणाले की, कांबळे यांनी शिंदे गटात प्रवेश केला तरी. आम्हाला काही फरक पडत नाही. मंगेश सातमकर गेले तेव्हा काही फरक पडला नाही तर चार वर्षापूर्वी शिवसेनेत आलेल्या रामदास कांबळे गेल्यामुळे कसा फरक पडेल? ते स्वतःच्या स्वार्थासाठी गेले आहेत.असेही ते म्हणाले.

## सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याहस्ते संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान स्मरणिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी
■ मुंबई

शालेय विद्यार्थ्यांना नैतिक जीवन आणि चारित्र्य निर्माण शिकवणाऱ्या देशातील आघाडीची सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था "संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान" च्या नव्याने प्रकाशित झालेल्या स्मरणिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अधिवक्ता आशिष शेलार आणि इतर पाहुण्यांच्या हस्ते रविवार, ३ ऑगस्ट, २०२५ रोजी संध्याकाळी आयोजित एका गरिमापूर्ण समारंभात करण्यात आले.

मुंबईतील प्रभादेवी येथील यशवंत भवन सभागृहात मोठ्या संख्येने शिक्षक आणि नागरिकांच्या उपस्थितीत हा भव्य समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात सुप्रसिद्ध उद्योगपती डॉ. अजित गुंजीकर, विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय मंत्री गोविंद शेंडे, मुंबई प्रदेशाचे




धर्मपुंज विभाग प्रमुख संजय मुद्राळे, प्रतिष्ठानचे संस्थापक विश्वस्त मोहन सालेकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आशिष शेलार म्हणाले की, आज अल्पवयीन मुले गुन्हेगारी प्रवृत्ती, अंमली पदार्थांचे व्यसन, वडिलांचा अनादर, मनाची चंचलता आणि संयम आणि सहनशीलतेचा अभाव दाखवत आहेत. दुसरीकडे, आपली कुटुंब व्यवस्था कोसळत आहे आणि आजच्या शाळा केवळ परीक्षार्थी निर्माण करणारे कारखाने बनत आहेत. अशा काळात मुलांच्या मनात चांगले संस्कार कोण बिंबवणार? ते म्हणाले की, आपल्या प्राचीन धर्मग्रंथांमधील कथांच्या मदतीने शालेय विद्यार्थ्यांना जीवनाचे नैतिक धडे देऊन ही समस्या सोडवण्यासाठी "संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान" च्या यशस्वी प्रयत्नांचे मी मनापासून स्वागत करतो. तसेच त्यांनी हा उपक्रम सरकारी स्तरावरील सर्व शाळांपर्यंत पोहोचेल याची खात्री करण्याचे ठाम आश्वासन दिले.

विविध उपक्रमांची माहिती देताना प्रतिष्ठानचे समन्वयक गौरव कुलकर्णी . यावेळी प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सेवादार दत्ता राम नाईक, अलका गोडबोले, हरबला शहा, अविनाश जोशी, शशिकांत देसाई इत्यादींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच निधी संकलनात आघाडीवर असलेल्या बिना रेगे, राजश्री माने, कल्पना गायकवाड, शिवानी सरदेसाई, प्राची उपासनी इत्यादींना विशेष पाहुण्या डॉ. अजित गुंजीकर यांनी विविध भेटवस्तू देऊन सन्मानित केले. यावेळी डॉ. अजित गुंजीकर आणि गोविंदराव शेंडे यांनी समयोचित मुद्दे मांडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निनाद कला पाठकच्या कलाकारांच्या मनमोहक नृत्य सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल निकम यांनी केले,सुरुवातीला संस्थेचे संस्थापक विश्वस्त मोहन सालेकर यांनी सर्व पाहुण्यांना पुष्पगुच्छ, तुळशीचे रोप आणि शाल देऊन स्वागत केले.

## कुलाबा पालिका शाळा इमारत धोकादायक, 1500 विद्यार्थ्यांची बसण्याची झाली गैरसोय

प्रतिनिधी
■ मुंबई

कुलाबा म. न. पा. शाळा संकुलात २ इमारतीत एकूण ८ शाळा असून ५ हजारापेक्षा अधिक मुले शिक्षण घेत आहेत. या संकुलातील एक इमारत धोकादायक ठरवून रिकामी करण्यात आली (C-1), दुसरी इमारत (C-2) दुरुस्तीसाठी नोव्हेंबर २०२४ ला संबंधित अधिकाऱ्यांनी दुरुस्ती करण्यासाठी पत्र दिले. १ मे २०२५ रोजी या इमारतीत मुले बसण्यास काहीच हरकत नाही असे सांगण्यात आले. आणि जून २०२५ अखेरीस अचानक शाळा धोकादायक असल्याचे सांगण्यात आले. एकाच वेळी दोन्ही इमारती रिकाम्या केल्याने मुलांची गैरसोय वाढली आहे.

कुलाबा इंग्रजी प्राथमिक शाळेतील मुले १५ जुलै पासून शाळेत येत नाहीत

### १५ जुलै पासून मुलांची शाळेकडे पाठ



कारण त्यांना बसण्यास जागा नाही. तब्बल २० दिवस मुले शाळे वाचून भटकत असल्याचे समजते. २०० पालकांनी शाळा सोडल्याचे दाखले काढून घेऊन खाजगी शाळेत प्रवेश घेतला.असल्याचे शिक्षक परिषदेचे मुंबई विभागाचे कार्यवाह शिवनाथ दराडेंनी सांगितले.

दराडे यांनी पालिका आयुक्तांना पत्र देऊन मुंबई पब्लिक स्कूल इंग्रजी प्राथमिक शाळा कुलाबा १५०० विद्यार्थ्यांची बसण्याची तत्काळ सोय करण्याची मागणी केली आहे. हा सर्व प्रकार गैरनियोजनाचा आहे. टप्प्या टप्प्याने दुरुस्तीचे हे काम केले असते तर मुलांची गैरसोय टळली असती. S. I. C. कडून अनेक इमारती पाडून ५/६ वर्ष बांधकामच सुरु नसल्याचे लक्षात आले आहे. असे म्हटले आहे

शिक्षक, मुख्याध्यापक, कनिष्ठ अधिकारी शाळेसाठी तात्पुरती ३/४ वर्ष जागा मिळावी म्हणून प्रयत्न करत आहेत. आदर्श इमारत, M. T. N. L. कुलाबा इमारत, या ठिकाणची रिकामी जागा, हुतात्मा चौकातील एक रिकामी इमारत येथे प्रयत्न करून अजून यश आले नाही. ३/४ वर्ष मुलांची बसण्याची व्यवस्था करावी किंवा या शाळेतील मुले खाजगी शाळेत स्थलांतरीत करावी. १५०० मुले असल्याने अचानक जागा कोठे मिळणार किंवा एकदम इतर शाळेत प्रवेश कसा मिळणार ही मोठी समस्या असल्याने उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालावे आणि मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी. असे नमूद करून स्कूल इन्फ्रास्ट्रक्चर डिपार्टमेंट यांनी ही बाब मे महिन्यात केली असती तर सत्र सुरु झाल्या नंतर अचानक अशी समस्या उदभवली नसती. शैक्षणिक प्रशासनात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालून मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी मागणीही शिवनाथ दराडे यांनी केली आहे.

## महापालिकेतील तीन उपायुक्तांच्या खात्यांची अदलाबदल

**मुंबई:** मुंबई महापालिकेतील उपायुक्तांकडे असलेला अतिरिक्त विभागाचा कार्यभार शुक्रवारी बदलण्यात आला.. यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे उपायुक्त असलेले शरद उघाडे यांच्याकडे आपत्तकालीन व्यवस्थापन विभागाचा कार्यभार देण्यात आला. तर माहिती तंत्रज्ञान विभागाचा कार्यभार अग्निशामक विभागाचे उपायुक्त प्रशांत गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. एकूणच या झालेल्या खाते बदल्यांची महापालिका मुख्यालयात चांगलीच चर्चा रंगली आहे. येत्या काही दिवसांत आणखी काही उपायुक्तांच्या बदल्या व खांदेपलाट होणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

## 10 महिन्यांपूर्वी भूमिपूजन होऊनही आश्रय योजनेचे काम सुरु नाही

### पालिका सफाई कामगारांची परवड

प्रतिनिधी
■ मुंबई

फोर्ट मध्ये आश्रय योजनेखाली सफाई कर्मचाऱ्यांच्या घरे बांधणीच्या कामाचे १० महिन्यांपूर्वी भूमिपूजन झाले आहे. पण या कामाला अद्याप सुरुवात झालेले नाही. त्यामुळे त्यांची परवड होत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी या कामगारांना मुंबईचे 'खरे नायक' म्हणून गौरवण्यात आले होते, परंतु त्यांना आता पालिका प्रशासन विसरून गेली आहे. अशी टीका स्थानिक नगरसेवक अँड मकरंद नार्वेकर यांनी केली आहे. त्यांनी पालिका आयुक्तांना पत्रही लिहिले आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये फोर्ट विभागाच्या कोचीन स्ट्रीट येथील सफाई कर्मचाऱ्यांसाठी आश्रय योजनेच्या गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अंदाजे १७ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पात २३८ चौरस फूट प्रत्येकी ५४ सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सफाई कर्मचाऱ्यांना सन्मानजनक घरे मिळणे ही बऱ्याच काळापासून न्याय मागणी प्रलंबित होती.आपले शहर स्वच्छ ठेवण्याव्यतिरिक्त, इतरही स्वच्छता मोहिमेसारख्या उपक्रमांमध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत त्यांची फसवणूक झाल्याची भावना आहे. कारण प्रकल्प अद्याप सुरू झालेला नाही. निवडणुकांपूर्वी मते मिळविण्यासाठी प्रकल्पांना गती मिळते मात्र बीएमसीने त्यानंतर हा प्रकल्प थंड बस्त्यात टाकला आहे हे कदापि मान्य नाही, असे मकरंद नार्वेकर यांनी सांगितले.

नार्वेकर पुढे म्हणाले की, इमारत १ आणि २ च्या पुनर्विकासासाठी डिझाइन आणि बिल्ड निविदेअंतर्गत प्रत्येकी २३८ चौरस फूट क्षेत्रफळाच्या ५४ सदनिका मंजूर करण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया सुरू झाल्यापासून हा प्रस्ताव थंड बस्त्यात टाकल्याने महापालिका सफाई कर्मचाऱ्यांबाबत गंभीर असून त्यांच्या कल्याणाशी काही देणे घेणे नसल्याचे दाखवून दिल्याचे दिसते. यामुळे लोकांचा प्रशासनावरील जनतेचा विश्वासच कमी होत चालला आहे,"

पालिका प्रशासनाने हा मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे. या कामगारांनी वर्षानुवर्षे आव्हानात्मक परिस्थितीत काम केले आहे आणि अशा विलंबामुळे व्यवस्थात्मक अन्याय आणखी वाढतो. असेही त्यांनी म्हटले आहे

## गणरायाच्या आगमनासाठी वाहतुकीचे नियोजन करा

### समन्वय समितीची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपात गणपती बाप्पाचे आगमन सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर आगमन व विसर्जन मिरवणुकांमध्ये कोणतेही अडथळे येऊ नये यासाठी वाहतूक नियोजन करण्याची मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने पोलिस आयुक्त देवेन भारती यांना पत्र पाठवून केली आहे.

गौरी विसर्जन व अनंत चतुर्दशीसारख्या दिवशी जसे गिरगाव व दादर चौपाटीकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहतुकीचे विशेष नियोजन केले जाते, त्याच धर्तीवर गणेशमूर्तींच्या आगमनासाठी वाहतुकीचे मार्ग एकेरी करून मूर्ती घेऊन जाणाऱ्या मंडळांना प्राधान्य देण्याची विनंती समितीने केली आहे.

पुढील दोन आठवड्यांत दादर, लालबाग, परळ या भागांतील मूर्तीकारांच्या कारखान्यांतून शेकडो मंडळे श्रींच्या मूर्ती घेऊन निघणार आहेत. अशा वेळी मूर्ती नेण्यासाठी खास मार्ग राखून ठेवल्यास वाहतूक कोंडी टाळता येईल, यामुळे वाहनधारकांची गैरसोयही टळेल, तसेच वाहतूकही सुरळीत सुरू राहील असे समितीचे म्हणणे आहे.

वाहतूक पोलिसांनी मूर्तिकारांच्या परिसरात तात्पुरती नो पार्किंग व्यवस्था केल्यास मंडळांना मूर्ती नेण्यात अधिक सुलभता येईल, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

"मूर्तिकार, मंडळांचे प्रतिनिधी, वाहतूक पोलीस, मुंबई पोलीस आणि महापालिका वॉर्ड अधिकारी यांनी योग्य समन्वय साधल्यास आगमन सोहळ्यात कुठेही गोंधळ अथवा अडथळा येणार नाही," असा विश्वास समन्वय समितीने व्यक्त केला आहे.

## बेस्टमधील कंत्राटी कर्मचारी संपाच्या तयारीत, 7 ऑगस्टला संपाबाबत निर्णय

### ९८ टक्के कर्मचाऱ्यांचा संपाच्या बाजूने कौल

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमात ज्याप्रमाणे कायम कामगारांना कायमस्वरूपी वेतन देण्यात येते, त्याचप्रमाणे खासगी कंत्राटी कर्मचारीही समान काम करीत असल्याने त्यांनाही "समान कामाला, समान वेतन" या न्यायाने वेतन देण्यात यावे, अशी कंत्राटी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. बेस्ट उपक्रमातील खासगी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे जुलै महिन्यात तीन टप्प्यात मतदान घेण्यात आले असून ९८ टक्के कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संपाच्या बाजूने कौल दिला आहे. मात्र बेस्ट उपक्रमातील या संपाबाबत ७ ऑगस्ट रोजी संघर्ष कामगार कर्मचारी युनियनच्या पदाधिकारी यांची बैठक होणार असून त्यामध्ये संप करावा की नाही ? यावर निर्णय घेण्यात येणारा आहे.यासंदर्भातील माहिती युनियनचे नेते शशांक राव यांनी दिली आहे.

बेस्ट उपक्रमात भाडे तत्वावर बसगाड्या घेण्यात आल्या आहेत. ५ हजार पेक्षाही जास्त कंत्राटी कर्मचारी काम करीत आहेत. मात्र या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून बेस्ट उपक्रमातील कायम कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे काम करवून घेण्यात येते. मात्र त्यांना तुटपुंजे वेतन देण्यात येते. त्यांना आवश्यक अथवा देय असलेल्या विविध सेवासुविधा देण्यात येत नाहीत. त्यांच्या अनेक समस्या आणि मागण्या प्रलंबित असून त्या मार्गी लावण्यात येत नाहीत. बेस्ट प्रशासन या कंत्राटी कर्मचाऱ्यांची दखल घेत नाही. त्यामुळे अखेर त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी युनियनने बेस्ट कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संप करावा की नाही, याबाबत जुलै महिन्यात तीन टप्प्यात मतदान घेतले होते. या मतदानाची गुरुवारी मतमोजणी करण्यात आली असता ९८ टक्के कर्मचाऱ्यांनी संपाच्या बाजूने कौल दिला, अशी माहिती कामगारबनेट शशांक राव यांनी दिली.

१६ आगारांमध्ये ३ टप्प्यांत घेतलेल्या मतदानात तब्बल ९८ टक्के कामगारांनी संपाच्या बाजूने कौल दिला आहे. ५,०५१ कर्मचाऱ्यांनी मतदान केले असून, त्यापैकी ४,९८६ कामगारांनी संपास पाठिंबा दिला आहे. संप होणार की नाही याबाबतचा अंतिम निर्णय येत्या ७ ऑगस्ट रोजी युनियनच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतला जाणार असल्याची माहिती युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी दिली.

| असे झाले मतदान :- | | |
|---|---|---|
| आगार | एकूण मतदार | झालेले मतदान |
| बॅकबे | ३०५ | २६६ |
| कुलाबा | १०० | ९५ |
| मुंबई सेंट्रल | ३३९ | ३१३ |
| वडाळा | ५०९ | ४३१ |
| आणिक | ३०० | २९८ |
| प्रतीक्षा नगर | ६०० | ५१४ |
| देवनार | २१६ | २०८ |
| शिवाजी नगर | २९६ | २९६ |
| घाटकोपर | २५८ | २५७ |
| मुलुंड | ५५२ | ४६८ |
| धारावी | ५०० | ३५५ |
| कुर्ला | १४०. | १०२ |
| सांताक्रूझ | ५५२ | ४४६ |
| मालवणी | ३०१ | २७० |
| मागाठाणे | ३७० | ३१५ |
| मजास | ४५० | ४१६ |
| एकूण मतदार | ५,९९८ | |
| एकूण मतदान | ५,०५१ | |
| संपाच्या बाजूने | ४,९८६ | |
| संप नको | ७ | |
| बाद मते | ५८ | |

## 'पृथ्वी' नंतर आता 'आवास' प्रकरणात कागदी कर्जाचा पर्दाफाश

प्रतिनिधी
■ मुंबई

पीएमसी बँक घोटाळ्यात आणखी एक मोठे प्रकरण समोर आले आहे, ज्यामध्ये आवास डेव्हलपर्सना ₹१३५ कोटी पर्यंत कर्ज मंजूर करण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात त्यांना फक्त ₹३० कोटी मिळाले. असे असूनही, बँकेने ₹१७० कोटींच्या वसुलीचा दावा केला आहे, जो कंपनीने चुकीचा आणि बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे.

चार्टर्ड अकाउंटंट दीपक सिंघानिया आणि असोसिएट्सच्या ऑडिट अहवालानुसार, ऑगस्ट २०१२ नंतर कोणतेही निधी हस्तांतरण झाले नाही. त्यानंतर, फक्त व्याज नोंदी जोडल्या गेल्या जेणेकरून कर्जाची फाइल सक्रिय दिसू शकेल. हे प्रकरण पृथ्वी रिअल्टर्ससारखेच आहे, ज्यांना ₹८७.५ कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले होते, परंतु ₹१ देखील हस्तांतरित करण्यात आले नाही. तरीही, व्याज जोडून, ₹१५० कोटींपेक्षा जास्त दायित्व निर्माण झाले. ही कंपनी आता एनसीएलटीमध्ये खटला लढत आहे आणि पीएमसीवर फसवणुकीचा आरोप केला आहे.

कंपनीने म्हटले आहे की त्यांनी मुंबई, पालघर आणि ठाणे येथील मालमत्ता गहाण ठेवल्या होत्या, परंतु कधीही पैसे मिळाले नाहीत. नंतर, कर्जाची मर्यादा अनेक वेळा वाढवण्यात आली, परंतु सर्व काही फक्त कागदपत्रांपुरते मर्यादित राहिले. आरबीआयच्या ऑडिट अहवालात असे दिसून आले आहे की पीएमसीने २१ हजारांहून अधिक बनावट कर्ज नोंदी नोंदवून ५ हजार कोटी रुपयांचा बनावट व्यवसाय दाखवला. या प्रकरणाची सुनावणी एनसीएलटीसमोर सुरू आहे, ज्यावर न्यायालय लवकरच निर्णय देऊ शकते.

## हल्ल्याच्या स्फोटाचा व्हिडिओ बनवणाऱ्या दोन रशियन मुलींना अटक

**मॉस्को -** रशियातील सोची येथील तेल डेपोवर युक्रेनने ड्रोनने हल्ला केला. हल्ल्यानंतर डेपोमध्ये मोठी आग लागली. क्रास्नोडार प्रदेशाचे गव्हर्नर वेनियामिन कोंड्रात्येव म्हणाले की, ड्रोनचा ढिगारा तेलाच्या टाकीवर आदळल्यानंतर आग लागली आणि ती विझवण्यासाठी १२० हून अधिक अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्यात आले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये डेपोमधून दाट काळा धूर निघताना दिसत आहे. हल्ल्यानंतर रशियाच्या नागरी विमान वाहतूक एजन्सी रोसावियात्सियाने सोची विमानतळावरील उड्डाणे काही काळासाठी थांबवली. यावेळी दोन रशियन मुलीही स्फोटाचा व्हिडिओ बनवताना दिसल्या. त्यांच्यासोबत पार्श्वभूमीत एक तरुणही उपस्थित होता.



# खरे भारतीय अशी विधाने करणार नाहीत
## सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना फटकारले...
### चीनने भारतीय भूप्रदेश बळकावल्याबाबत केले होते वक्तव्य

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांना भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय लष्करावर केलेल्या विधानांवरून तीव्र शब्दांत फटकारले आहे. "एक खरा भारतीय अशी विधाने करणार नाही," असे म्हणत न्यायालयाने याप्रकरणातील फौजदारी मानहानी खटल्यातील कार्यवाहीला स्थगिती दिली आहे.

राहुल गांधी यांनी डिसेंबर 2022 मध्ये भारत जोडो यात्रा दरम्यान दिलेल्या विधानात म्हटले होते की- "चिनी सैन्याने 2000 चौरस किलोमीटर भारतीय भूभाग काबीज केला आहे. 20 जवान मारले गेले आहेत आणि अरुणाचल प्रदेशमध्ये आमच्या जवानांना मारहाण केली आहे."हे विधान त्यांनी सार्वजनिक मंचावरून केले होते. आणि त्यावरून उदय शंकर श्रीवास्तव या सेवानिवृत्त सीमा रस्ते संघटनेच्या (BRO) संचालकांनी मानहानीचा खटला दाखल केला.

**सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट सवाल**

***न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने राहुल गांधींच्या वकिलांना विचारले की***

- *तुम्हाला हे विधान कुठून आणि कसे समजले?*
- *तुमच्याकडे पुरावे आहेत का?*
- *सार्वजनिक मंच किंवा सोशल मीडियावर अशा संवेदनशील गोष्टी बोलण्याची गरज काय?*

*न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, "असे विधान संसदेच्या सभागृहात करायला हवे, माध्यमांसमोर नव्हे."*



**राहुल गांधींची बाजू**

राहुल गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले की- गांधी यांना कलम 19 (1) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. ते संसद सदस्य असूनही, त्यांचे अधिकार कुठेही कमी झालेले नाहीत. त्यांच्या विधानाचा उद्देश माध्यमांद्वारे महत्त्वाचे राष्ट्रीय प्रश्न उपस्थित करणं होता.

विरोधात बाजू मांडणारे गौरव भाटिया, या खटल्यातील तक्रारकर्त्यांचे वकील, यांनी कार्यवाहीवर स्थगिती देण्यास विरोध केला. त्यांचा युक्तिवाद होता की- हे विधान लष्कराच्या मनोबलावर आघात करणारे आहे. चीनसोबतच्या सीमेवरील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, अशा वक्तव्यांमुळे देशातील जनतेमध्ये भ्रम निर्माण होतो. सर्वोच्च न्यायालयाने पुढील तीन आठवड्यांसाठी कार्यवाही स्थगित ठेवली असून, त्या कालावधीनंतर सर्व मुद्द्यांवर सविस्तर सुनावणी होणार आहे. यात मुख्यत्वे खटला दाखल करताना राहुल गांधी यांना ऐकून न घेताच समन्स का पाठवण्यात आले? आणि तक्रारदार हे पीडीत व्यक्ती मानले जाऊ शकतात का? हे मुद्दे महत्वाचे ठरतील.

# जम्मू-कश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा ?
## पंतप्रधान मोदी, गृहमंत्री शहांनी राष्ट्रपतींची भेट घेतल्याने चर्चांना उधाण



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

जम्मू आणि कश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा मिळणार का, या प्रश्नावर देशभरात चर्चेला उधाण आलं आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एकाच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंशी वेगवेगळ्या बैठक घेतल्या. विशेष म्हणजे ही बैठक 5 ऑगस्ट – म्हणजे कलम 370 हटवल्याच्या सहाव्या वर्धापन दिनाच्या दोनच दिवस आधी झाली.

या बैठकींची अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही, जे सामान्यतः अशा उच्चस्तरीय भेटींनंतर दिली जाते. त्यामुळे चर्चांना अधिक उधाण आले आहे. याशिवाय अमित शहा यांनी जम्मू-कश्मीरमधील भाजपचे प्रमुख आणि काही स्थानिक नेत्यांसोबतही स्वतंत्र बैठक घेतल्याचे समजते.

त्याचबरोबर पंतप्रधानांनी 5 ऑगस्टच्या पूर्वसंध्येला एनडीए खासदारांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावल्याची माहितीही मिळत आहे.

राजकीय वर्तुळासोबतच समाजमाध्यमांवरही जोरदार चर्चा सुरू आहेत. निवृत्त लष्करी अधिकारी आणि लेखक के. जे. एस. ढिल्लों यांनी यावर प्रतिक्रिया देताना सावध पावले टाकण्याचा सल्ला दिला. "काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होण्यासाठी अनेकांचे प्राण गेले. अशा स्थितीत कोणताही निर्णय घेताना घाई करू नये," असं त्यांनी ट्विट केलं.

ज्येष्ठ विश्लेषक आरती टिक्कू सिंह यांनी देखील जोरदार अफवा असल्याचे सांगितले की केंद्र सरकार जम्मू आणि कश्मीरला राज्याचा दर्जा देण्याच्या तयारीत आहे. काही अफवांनुसार जम्मू आणि कश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून वेगळं केलं जाऊ शकतं, जे अत्यंत गंभीर परिणाम घडवू शकते, असं त्यांनी म्हटलं.

5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 रद्द करून जम्मू-कश्मीर आणि लडाख अशी दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये फाळणी करण्यात आली होती. त्यावेळी जम्मू-कश्मीरची विधानसभाही बरखास्त झाली होती आणि प्रशासन केंद्राकडे गेला होता.

पान 1 वरुन...

## सगळे पायाभूत प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण व्हायला हवेत!

उत्तन-विरार सी लिंक, शिवडी-वरळी ईलेव्हेटेड कॉरिडॉर, पुणे मेट्रो, दहिसर ते भाईंदर लिंक रोड, गोरेगाव मागाठाणे डीपी रोड, गोरेगाव मुलुंड लिंक रोड आणि उत्तर सागरी किनारा मार्ग, विरार अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, धारावी पुनर्विकास प्रकल्प, जालना नांदेड महामार्ग, पुणे रिंगरोड, बांद्रा वर्सोवा सी लिंक, छत्रपती संभाजी नगर शहर पाणी पुरवठा प्रकल्प, कुडूस आरे कनेटिव्हिटी, कुडुस बाभळेश्वर वीज जोडणी प्रकल्प, शिक्रापूर बाभळेश्वर विद्युत प्रकल्प, वाढवण बंदर प्रकल्प आदी प्रकल्पांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

## अलमट्टी धरण उंची वाढवण्यासंदर्भातील कर्नाटकचा प्रस्ताव केंद्राने परत पाठवला

विशाल पाटील हे चार खासदार. तसेच सतेज पाटील, विश्वजीत कदम, अरुण लाड यांचा समावेश होता. जलशक्ती मंत्र्यांसोबतच्या बैठकीपूर्वी या सर्व लोकप्रतिनिधींची नवीन महाराष्ट्र सदनात देखील या विषयावर बैठक झाली.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, कोल्हापूर-सांगली परिसरातील पूर परिस्थितीला अलमट्टी धरण जबाबदार असल्याचे मंत्र्यांना सांगितले. त्यांना सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात धरण प्रभावित क्षेत्रातील आकडेवारी सादर केली असल्याचे ते म्हणाले. बैठकीत विस्ताराने चर्चा झाली. सध्या सर्वोच्च न्यायालयात अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याला स्थगिती आहे. त्यामुळे केंद्र सरकार लगेच या विषयात हस्तक्षेप करणार नाही, असे विखे पाटील म्हणाले. महाराष्ट्राचा धरणाच्या उंची वाढीला विरोध का आहे? हे आकडेवारीसह केंद्रीय मंत्र्यांना सांगितले, असे विखे पाटील म्हणाले. हिप्परगी बॅरेजमुळे जे प्रश्न उद्भवतात, त्यामध्ये काय अनियमितता झाली आहे. ते मंत्र्यांना सांगितल्याचे विखे पाटील म्हणाले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने केंद्र सरकारने कर्नाटक सरकारचा धरणाची उंची वाढवण्यासंदर्भातील प्रस्ताव परत पाठवला आहे, असे विखे पाटील म्हणाले. या विषयाच्या अभ्यासासाठी या प्रकरणीचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि केंद्र सरकारची संयुक्त समिती गठित करण्याची विनंती मंत्र्यांकडे केली. मात्र न्यायालयीन स्थगितीमुळे समिती स्थापनेला अडचणी असल्याचे मंत्र्यांनी सांगितले असल्याचे विखे पाटील म्हणाले. सध्या धरणावर कुठल्याच प्रकारचे काम सुरू नाही. परिस्थिती जैसे थी असल्याचे विखे पाटलांनी सांगितले.



# भगवान श्रीकृष्ण हे पहिले मध्यस्थ होते, त्यामुळे पक्षकारांनीही संवाद साधावा
## सुप्रीम कोर्टाने सुनावले

वृत्तसंस्था
वृंदावन/नवी दिल्ली

वृंदावनमधील प्रसिद्ध श्री बांकेबिहारी मंदिराच्या व्यवस्थापन आणि उत्तर प्रदेश सरकारच्या 500 कोटी रुपयांच्या कॉरिडॉर विकास योजनेवरून सुरू असलेल्या वादात सर्वोच्च न्यायालयाने आज महत्त्वाची टिप्पणी केली – "भगवान श्रीकृष्ण हे पहिले मध्यस्थ होते, त्यामुळे पक्षकारांनीही संवाद साधावा."

श्री बांकेबिहारी मंदिर 1862 मध्ये बांधले गेले. हे मंदिर उत्तर भारतातील एक श्रद्धास्थान आहे. मंदिर व्यवस्थापन जबाबदारी शेबायत नावाच्या पारंपरिक पुजारी कुटुंबांकडे आहे. 2022 मध्ये जन्माष्टमी दरम्यान चेंगराचेंगरीसदृश घटनेत दोन भाविकांचा मृत्यू झाल्यानंतर मंदिरात भाविकांची वाढती गर्दी आणि सुरक्षिततेचा अभाव पाहता उत्तर प्रदेश सरकारने कॉरिडॉर विकास योजना आखली. या योजनेनुसार मंदिराच्या निधीतून (500 कोटी रुपये) विकासकामे करायची होती. मात्र, मंदिराचे पारंपरिक व्यवस्थापक आणि राज्य सरकारमध्ये यावरून वाद निर्माण झाला.

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत स्पष्टपणे उत्तर प्रदेश सरकारवर नाराजी व्यक्त केली. न्यायमूर्ती सुर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, "सरकारने खाजगी पक्षांमध्ये चालू असलेल्या वादात हस्तक्षेप करत न्यायालयाची परवानगी न घेता मंदिराच्या निधीचा वापर करण्याची परवानगी घेतली, हे योग्य नव्हते." "या प्रकरणात राज्य सरकार इतक्या घाईने कसे सहभागी झाले? कोणतीही सार्वजनिक सूचना किंवा मंदिराकडून बाजू मांडण्याची संधी दिली गेली नाही. हा वाद सार्वजनिक जागेसंबंधी नसून, खासगी पक्षांमधील होता. राज्य सरकारने हस्तक्षेप करून न्यायप्रक्रियेचा अपमान केला आहे."

न्यायालयाने या प्रकरणात तात्पुरता तोडगा म्हणून निवृत्त उच्च न्यायालय न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक तात्पुरती मध्यस्थ समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला. ही समिती पुढीलप्रमाणे काम पाहणार आहे. निधीचा योग्य वापर करत भाविकांसाठी मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे

**अध्यादेशावर प्रश्नचिन्ह**

या वादातील मुख्य मुद्दा उत्तर प्रदेश सरकारचा अध्यादेश आहे ज्याद्वारे मंदिराचे पारंपरिक व्यवस्थापक बाजूला केले गेले आणि सरकारने स्वतःचा ट्रस्ट स्थापन करून निधीच्या वापरास मान्यता घेतली. यावर सर्वोच्च न्यायालय म्हणाले,"आधी अध्यादेशाची घटनात्मक वैधता तपासणे गरजेचे आहे. त्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे ही जबाबदारी सोपवली पाहिजे. जर सरकारला खरोखर विकास करायचा असेल, तर खासगी जमिनी अधिग्रहण करून त्यावर कायदेशीररित्या काम सुरू करता आले असते."

## गुन्हा नोंदण्यास टाळाटाळ का?

कारणावरून या तीन सामाजिक कार्यकर्त्या तरुणींच्या घरात घुसून पोलिसांनी ही कारवाई केल्याचे समजते. या मुजोर पोलिसांना कोण पाठिशी घालत आहे? पुण्याचे पोलीस आयुक्त काय खुर्चीवर बसून झोपा काढतात काय. कोणाच्या दडपणाखाली पोलीस काम करत आहेत. एफआयआर नोंदवण्यास कोणत्या मुहुर्ताची वाट पहात आहेत. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व पुण्याच्या पालकमंत्र्यांनी जातीने या प्रकरणी लक्ष घालून मुजोर पोलिसांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.

# पतीची खरी कमाई उघड करण्यासाठी पत्नी बँक अधिकाऱ्यांना समन्स पाठवू शकते
## दिल्ली हायकोर्टाचा मोठा निर्णय

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्ली उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय देताना स्पष्ट केलं आहे की, पतीने त्याची खरी आर्थिक स्थिती लपवण्याचा प्रयत्न केल्यास, पत्नीला बँक अधिकाऱ्यांना व इतर साक्षीदारांना समन्स पाठवण्याचा हक्क आहे, जेणेकरून पतीची खरी कमाई उघड करता येईल. फेब्रुवारी 2012 मध्ये विवाहबद्ध झालेल्या एका महिलेने तिच्या पतीविरोधात कौटुंबिक हिंसाचार, हुंड्याची मागणी आणि तिचे 'स्त्रीधन' (दागदागिने व रोकड) परत न केल्याचा आरोप केला होता. तिच्या म्हणण्यानुसार, विवाहानंतर काही काळातच पती आणि सासरच्यांनी तिला घराबाहेर काढलं आणि तिचा संपर्क पूर्णपणे तोडला. तिने दावा केला की, पतीने नोएडा येथील मालमत्तेची विक्री करून त्याची रक्कम आईच्या बँक खात्यात वळवली आणि त्या पैशाचा उपयोग शक्तिनगरमधील मालमत्ता खरेदीसाठी केला. तसेच त्याने स्वतःची मालमत्ता, 2014 मध्ये मुख्य आर्थिक अधिकारी (CFO) म्हणून झालेली नेमणूक आणि इतर आर्थिक स्रोत लपवले.

पत्नीने भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता (CrPC) च्या कलम 311 अंतर्गत याचिका दाखल केली होती. या कलमानुसार, कोणत्याही टप्प्यावर साक्षीदारांना बोलावण्याचा किंवा पुन्हा चौकशी करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, जेणेकरून सत्य बाहेर येऊ शकेल. न्यायमूर्ती रवींद्र डुडेजा यांनी 11 पानी निर्णयात म्हटलं की, "कौटुंबिक प्रकरणांमध्ये, विशेषतः आर्थिक अवलंबित्व आणि माहिती लपवण्याचे आरोप असताना, न्यायालयाने अधिक संवेदनशील आणि व्यावहारिक दृष्टिकोन ठेवला पाहिजे."

# नवज्योत सिंग सिद्धूंच्या पत्नीची 10 कोटींची फसवणूक
## आरोपीचा पासपोर्ट जप्त, आत्मसमर्पणाचे आदेश



वृत्तसंस्था
चंदीगड

पंजाबचे माजी मंत्री आणि माजी क्रिकेटपटू नवज्योत सिंग सिद्धू यांच्या पत्नी नवज्योत कौर सिद्धू यांची १० कोटींच्या फसवणूक प्रकरणात सुनावणी झाली. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने आरोपी गगनदीप सिंगला एका आठवड्यात भारतात परतण्याचे आणि पोलिसांसमोर आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने त्याचा पासपोर्ट जप्त करण्याचे निर्देशही दिले आहेत.

नवजोत कौर यांचे वकील करण सचदेवा म्हणाले की, आरोपीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाच्या न्यायपीठाने हा आदेश दिला आहे. नवज्योत सिंग सिद्धू यांच्या पत्नी तक्रारदार नवज्योत कौर सिद्धू यांचे वकील करण सचदेवा यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, आरोपी गगनदीप सिंगने स्वतःला बिल्डर म्हणून सांगून त्यांना शोरूममध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले आणि मोठ्या नफ्याचे आश्वासन दिले. या विश्वासात नवजोत कौर यांनी १० कोटी गुंतवले. पैसे परत करण्याची वेळ आली तेव्हा आरोपीने टाळाटाळ केली आणि शेवटी देश सोडून दुबईला पळून गेला. यावर तक्रारदाराने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी पटियाला पोलिसांकडे फसवणुकीची तक्रार दाखल केली.

## धीरेंद्र यांना महिला तस्कर म्हणणाऱ्या प्राध्यापकाविरुद्ध FIR

खजुराहो

बागेश्वर धामचे पीठाधीशेश्वर पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना महिला तस्कर म्हणणाऱ्या यूपीच्या एका प्राध्यापकाविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. लखनऊ विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे सहयोगी प्राध्यापक रविकांत यांनी ३१ जुलै रोजी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली होती. त्यात लिहिले होते - "अजैविक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे घोषित धाकटे बंधू धीरेंद्र शास्त्री धर्माच्या नावाखाली महिला तस्करी करत आहेत." छतरपूरचे बामिठा पोलिस स्टेशनचे प्रभारी आशुतोष सिंह यांनी सांगितले की, बागेश्वर धाम जन समितीचे धीरेंद्र कुमार गौर यांनी रविवारी रात्री १२ वाजता तक्रार दाखल केली होती. प्राध्यापकाविरुद्ध कलम ३५३ (२) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कलमाअंतर्गत, जर कोणी द्वेष किंवा शत्रुत्व निर्माण करण्याच्या किंवा वाढवण्याच्या उद्देशाने एखाद्याच्या भावना दुखावणारे किंवा खोटी माहिती, अफवा किंवा भयावह बातम्या पसरवणारे विधान केले तर

# पंजाबमध्ये बनावट चकमक प्रकरणात 32 वर्षांनंतर शिक्षा
## निवृत्त SSP व DSP सह 5 पोलिस अधिकाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा

वृत्तसंस्था
मोहाली

सोमवारी, पंजाबमधील तरनतारन येथे १९९३ च्या बनावट चकमक प्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने शिक्षा सुनावली. न्यायालयाने निवृत्त एसएसपी भूपेंद्रजीत सिंग, डीएसपी दविंदर सिंग, इन्स्पेक्टर सुबा सिंग, एएसआय गुलबर्ग सिंग आणि एएसआय रघबीर सिंग यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

या सर्वांवर ७ जणांच्या हत्येचा आणि गुन्हेगारी कट रचल्याबद्दल आयपीसीच्या कलम ३०२ आणि १२०-ब अंतर्गत खटला चालवण्यात आला. सुरुवातीला या प्रकरणात १० पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आरोपी बनवण्यात आले होते, परंतु त्यापैकी ५ जणांचा खटल्यादरम्यान मृत्यू झाला. हे प्रकरण १९९३ चे आहे, ज्यामध्ये २ वेगवेगळ्या चकमकीत ७ जणांना मृत दाखवण्यात आले होते. तर त्यापैकी ४ जण विशेष पोलिस अधिकारी (एसपीओ) म्हणून तैनात होते. २७ जून १९९३ रोजी गुन्हेगारांनी लोकांना त्यांच्या घरातून उचलून नेले आणि त्यांना अनेक दिवस बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवले आणि त्यांच्यावर अत्याचार केले. २८ जुलै १९९३ रोजी तत्कालीन डीएसपी भूपेंद्रजीत सिंग यांच्या नेतृत्वाखाली बनावट चकमक घडवण्यात आली. तरनतारनच्या ठाणे वैरोवाल आणि ठाणे सहरली येथे बनावट पोलिस चकमकींसाठी दोन स्वतंत्र एफआयआर नोंदवण्यात आले. बनावट चकमकीत ७ जणांचा मृत्यू झाला.

# देशातील सर्व दलितांनी एकत्र येऊन आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष मजबूत करावा!

वृत्तसंस्था
आग्रा

देशभरातील सर्व दलितांनी एकत्र येऊन महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष मजबूत करावा.विविध दलितांच्या ऐक्यातून मजबूत होणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद बहन मायावती यांनी स्वीकारावे असे राष्ट्रीय स्तरावरील रिपब्लिकन ऐक्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज आगरा येथे केले.




आगरा येथील सुरसदन सभागृहात उत्तर प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने संविधान सन्मान मेळावा आयोजित करण्या आला होता.त्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ना.रामदास आठवले बोलत होते. मायावती यांनी उत्तर प्रदेशचे चार वेळा मुख्यमंत्री पद भूषविले आहे.त्या आज देशात सर्वात वरिष्ठ दलित नेत्या आहेत.त्यांना मुख्यमंत्री करण्यात मान्यवर कांशीराम यांचे मोठे योगदान आहे. उत्तर प्रदेशात कांशीराम यांनी सामाजिक क्रांतीसाठी दिलेले योगदान महत्वपूर्ण असून त्यांचा आम्ही आदर करतो. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्यासाठी देशभरातील दलितांनी एकजूट उभारणे गरजेचे असून देशभरातील रिपब्लिकन ऐक्याचे राष्ट्रीय नेतृत्व मायावती यांनी करावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी आज केले. आगरा हा आंबेडकरवाद्यांचा बालेकिल्ला आहे.आगरा येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती भव्य प्रमाणात साजरी केली जाते. आगरा येथेच देशात जयभीम चा नारा पहिल्यांदा बुलंद करण्यात आला होता.दलितांनी सामाजिक एकजुटी सोबत राजकीय एकजूट उभारली पाहिजे असे मत न.रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केले.

उत्तर प्रदेशात आता बसपा चा केवळ एक आमदार आणि एक खासदार आहे. बसपा चा राजकीय करिष्मा लोपला आहे.त्यामुळे उत्तर प्रदेशातील बसपा कार्यकर्त्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाचा निळा झेंडा हाती घ्यावा.उत्तर प्रदेशात जेव्हा चौधरी चरण सिंह यांचे सरकार होते तेव्हा उत्तर प्रदेशात रिपब्लिकन पक्षाचे 4 आमदार निवडून आले होते.आता आगामी काळात उत्तर प्रदेशात रिपब्लिकन पक्षाचे किमान 5 आमदार निवडून आणू असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

# संजय कपूरचा मृत्यू संशयास्पद
## संजय कपूरच्या आईला संशय

**राणी कपूर यांनी युके पोलिसांना पत्र लिहून गुन्हेगारी चौकशीची मागणी**



वृत्तसंस्था
लंडन

करिश्मा कपूरचे माजी पती आणि दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या मालमत्तेचा वाद वाढत आहे. त्यांच्या मृत्यूबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संजयची आई राणी कपूर यांनी यूके पोलिसांना पत्र लिहून त्यांच्या मुलाचा मृत्यू संशयास्पद असल्याचे म्हटले आहे आणि या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

राणी कपूरने असा दावा केला आहे की त्यांच्याकडे विश्वासार्ह आणि गंभीर पुरावे आहेत जे स्पष्टपणे दर्शवतात की संजयचा मृत्यू अपघाती किंवा नैसर्गिक नव्हता परंतु खून, चिथावणी, कट, फसवणूक आणि बनावटगिरी यासारख्या गुन्हेगारी कटाची शक्यता असू शकते.

त्यांनी असाही दावा केला की त्यांच्याकडे बनावटगिरी, संशयास्पद मालमत्ता हस्तांतरण आणि शंकास्पद कायदेशीर कागदपत्रांकडे लक्ष वेधणारे अनेक रेकॉर्ड आहेत. या रेकॉर्डवरून संजयच्या मृत्यूमुळे आर्थिक फायदा झालेल्यांचे संगनमत दिसून येते.

राणी कपूर यांनी पत्रात पुढे लिहिले आहे की संजयचा मृत्यू हा एका सुनियोजित आंतरराष्ट्रीय कटाचा भाग असू शकतो, ज्यामध्ये युनायटेड किंग्डम, भारत आणि कदाचित अमेरिकेतील काही व्यक्ती आणि संघटनांचा सहभाग असल्याचा संशय आहे, असे मानण्याची तिच्याकडे ठोस कारणे आहेत.या प्रकरणाचे गांभीर्य आणि खून, गुन्हा करण्याचा कट रचणे, खोट्या सादरीकरणाद्वारे फसवणूक, बनावटगिरी यासह यूके कायद्यांतर्गत अनेक संभाव्य गुन्हे लक्षात घेता, मी आदरपूर्वक विनंती करते की ताबडतोब औपचारिक तक्रार दाखल करावी आणि फौजदारी चौकशी सुरू करावी. सुमारे दोन आठवड्यांपूर्वी, संजयची आई राणी कपूर यांनी दावा केला होता की त्या ऑटो कंपोनंट कंपनीमध्ये कपूर कुटुंबाच्या हितसंबंधांची एकमेव प्रतिनिधी आहे. १० वर्षांपूर्वीच्या मृत्युपत्राचा हवाला देत, राणी कपूर यांनी दावा केला होता की ३० जून २०१५ च्या मृत्युपत्रानुसार, त्या त्यांचे दिवंगत पती सुरिंदर कपूर यांच्या मालमत्तेची एकमेव लाभार्थी आहे. यामुळे त्या सोना ग्रुपची बहुसंख्य भागधारक बनल्या, ज्यामध्ये ऑटो कंपोनंट फर्ममध्ये त्यांचा वाटा समाविष्ट आहे. राणी कपूर यांनी यूकेमध्ये मुलाच्या मृत्यूवरही प्रश्न उपस्थित केले होते आणि ते संशयास्पद म्हटले होते.